रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ७३
www.ramprahar.com
रविवार, २९ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कर्जत वडवलीत सुमारे १५ लाखांच्या ऐवजाची चोरी/२
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
खालापूरमध्ये परतीच्या पावसात घर पडले/७

## महाराष्ट्रात महिला मतदारांमध्ये लक्षणीय वाढ



**मुंबई :** गेल्या दोन दिवसांपासून महाराष्ट्र दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाने आगामी विधानसभा निवडणुकीच्या राजकीय पक्षांच्या पदाधिकारी तसेच प्रशासनासोबत बैठका घेत राज्यातील परिस्थिती जाणून घेतली. त्यानंतर शनिवारी (दि. २८) पत्रकार परिषद घेत विधानसभा निवडणुकीबाबत भाष्य केले. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी तीन वर्षांपेक्षा जास्त कार्यकाळ ज्यांची सेवा झाली अशा अधिकाऱ्यांच्या तत्काळ बदल्या करा, असे आदेश दिले आहेत. शिवाय शिवाय महाराष्ट्रात किती मतदार आहेत याबाबत माहिती दिली. त्यानुसार राज्यात पुरुष मतदार ४.९५ कोटी आणि स्त्री ४.६४ कोटी आहेत. तृतीयपंथीय मतदार ५९९७ इतके आहेत, तर दिव्यांग मतदार ६.३२ लाख आहेत. राज्यांत महिला मतदारांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून १०.७७ लाख मतदार आहेत.

### तळोजात ॲडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरचे भूमिपूजन

# ॲडव्होकेट ॲक्ट सुधारणेसाठी प्रयत्न करणार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल, नवी मुंबई :** देशातील पहिली ॲडव्होकेट अकॅडमी महाराष्ट्रात साकारली जात आहे याचा निश्चित आनंद आहे. यासाठी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे मनःपूर्वक अभिनंदन! शासनाने या अकॅडमीच्या उभारणीसाठी जागा दिली आहे. समाजाच्या दृष्टीने आणि शासनासाठी ही अकॅडमी उपयुक्त ठरेल यात शंका नाही. ॲडव्होकेट ॲक्ट सुधारित करण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. २८) केले.

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या वतीने तळोजा येथे उभारण्यात येणाऱ्या ॲडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरचे भूमिपूजन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झाले. त्यानंतर नेरूळच्या डॉ.डी.वाय. पाटील सेंटर ऑफ एक्सलन्स येथे झालेल्या समारंभात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

या कार्यक्रमास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष खासदार मनन कुमार मिश्रा, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए.एस गडकरी, नितीन सांबरे, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ, गोव्याचे महाधिवक्ता देविदास पांगम, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे चेअरमन संग्राम देसाई, माजी चेअरमन तथा विद्यमान सदस्य पारिजात पांडे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या ॲडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरसाठी ५० लाख रुपयांची देणगी धनादेशाच्या स्वरूपात दिली. याबद्दल मान्यवरांनी कौतुक केले.

आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, न्यायदानाचे क्षेत्र वेगाने बदलत आहे. या क्षेत्रातही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे. कोविड काळात सुप्रीम कोर्टाच्या पुढाकाराने ऑनलाईन न्यायदानाचे उत्तम कार्य पार पडले. त्यामुळे या क्षेत्रातील पारदर्शकता वृद्धिंगत झाली. नुकतेच उच्च न्यायालयाच्या इमारतीचे भूमिपूजन झाले तसेच आज या ॲडव्होकेट अकॅडमी आणि संशोधन केंद्राचेही भूमिपूजन झाले आहे. या अकॅडमीसाठी शासनाकडून १० कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. नवीन वकिलांसाठी विद्यावेतन देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. अकॅडमीच्या माध्यमातून न्यायदानाच्या क्षेत्रात उत्तम काम होईल आणि चांगले कायदे बनविण्यासाठी या अकॅडमीची मदत होईल. **(पान २ वर..)**

#### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून ५० लाखांची देणगी

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या ॲडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरसाठी ५० लाख रुपयांची देणगी धनादेशाच्या स्वरूपात दिली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आपल्या भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वाचा आवर्जून उल्लेख केला तसेच मी त्यांना आधीपासून ओळखतो, कारण ते व माझे वडील रा.सु. गवई व हे मित्र राहिलेले आहेत, असे सांगितले.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



## रायगडसह कोकणच्या सर्वंकष औद्योगिक विकासाला गती देणार –उद्योगमंत्री सामंत

### महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्य शासन महाराष्ट्राच्या समतोल औद्योगिक विकासासाठी कटिबद्ध आहे. उद्योग विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या समन्वयाने विविध उपक्रम हाती घेण्यात आले. त्यातून राज्याकडे आकर्षित झालेली मोठी गुंतवणूक, निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधी हे सरकारचे यश असल्याचे सांगून रायगड जिल्ह्यासह कोकणच्या सर्वंकष औद्योगिक विकासाला गती देण्यात येत आहे, असे प्रतिपादन उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी (दि. २८) केले.

गत दोन वर्षात महाराष्ट्राने औद्योगिक क्षेत्रात साध्य केलेल्या प्रगतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आज भारतात पहिल्या स्थानावर आहे. अनेक महत्त्वाचे निर्णय शासनाने या दोन वर्षात घेतले. महाराष्ट्राने घेतलेल्या अनेक महत्त्वाच्या निर्णयांची माहिती उद्योग जगत साकारणाऱ्या उद्योजकांना व व्यावसायिकांना व्हावी, राज्याचे व्हिजन कळावे या उद्देशाने उलवे नोड येथील स्व. दि.बा. पाटील भूमिपुत्र भवन या ठिकाणी 'उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी मंत्री सामंत बोलत होते.

व्यासपीठावर खासदार सुनील तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त प्रदीप चंद्रन, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उद्योग सहसंचालक विजू सिरसाठ, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या आदी उपस्थित होते.

राज्यात अनेक गेमचेंजर प्रकल्प येत आहेत हे सांगताना आनंद होत असल्याचे सांगून उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी शासनाने सकारात्मक धोरण स्वीकारले. त्यामुळे उद्योगांना पोषक वातावरण तयार झाले आहे. **(पान २ वर..)**

#### विविध लाभांचे प्रातिनिधिक वाटप

उद्योग विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध लाभांचे या वेळी प्रातिनिधिक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास विविध औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी, उद्योजक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले.

### माझी वसुंधरा ४.० अभियानात

## पनवेल महापालिका राज्यात पहिली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० या अभियानांतर्गत पनवेल महापालिकेने विविध उपक्रम राबवित राज्यातील ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटामध्ये पहिला क्रमांक पटकावला आहे. या पुरस्काराने पनवेल महापालिकेच्या मुकुटात मानाचा तुरा रोवला गेला असून सात कोटी रुपये बक्षिसाची रक्कम पालिकेस मिळणार आहे.

पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित माझी वसुंधरा अभियान हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २ ऑक्टोबर २०२० राबविण्यास सुरुवात झाली. या अभियानाचे चौथे पर्व १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानात राज्यातील एकूण २२,६३२ स्थानिक संस्थांनी सहभाग घेतला होता. यामध्ये पनवेल महापालिकेने बाजी मारल्याने तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख तसेच विद्यमान आयुक्त मंगेश चितळे, सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



माझी वसुंधरा ४.० अंतर्गत पर्यावरण विभागामार्फत नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जनजागृती करण्याच्या दृष्टीने गेल्या वर्षभरापासून पर्यावरण विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते व टीमने तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने महापालिका क्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा मोहीम हाती घेतली होती. या स्पर्धेला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद लाभला.

या अभियान ४.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण सेवा योजना महापालिकेच्या वतीने माध्यमिक विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. **(पान २ वर..)**

### खालापूरमधील तीन ग्रामपंचायतींनाही पुरस्कार जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या माझी वसुंधरा ४.० अभियानात रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. अभियानांतर्गत खालापूर तालुक्यातील वडगाव, तांबाटी, साजगाव ग्रामपंचायतींना पुरस्कार जाहीर झाला असून कोकण विभागात सर्वोत्तम कामगिरीत रायगड जिल्हा परिषद अव्वल ठरली आहे.

माझी वसुंधरा अभियान ४.०मध्ये ५ ते १० हजार लोकसंख्या असणाऱ्या गटात खालापूर तालुक्यातील वडगाव ग्रामपंचायतीने कोकण विभागात पहिला व राज्यात सातवा क्रमांक पटकावल्याने ग्रामपंचायतीला ५० लाख रुपये बक्षीस प्राप्त होणार आहे. **(पान २ वर..)**

### विद्यार्थिनीला उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन पनवेल येथील श्लाघ्यता राजेश ठाकूर या विद्यार्थिनीला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून साडेचार लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीस वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते. श्लाघ्यता ही एमबीबीएसचे वैद्यकीय शिक्षण जॉर्जिया या देशातील ईस्ट युरोपियन युनिव्हर्सिटीमध्ये घेणार आहे. त्यासाठी तिला आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार तिला मदत करण्यात आली आहे.

## आयपीएल खेळाडूंना सामन्यासाठी ७.५ लाख; पूर्ण लीग खेळणाऱ्यांना १.०५ कोटी

### बीसीसीआयचे सचिव जय शाह यांची मोठी घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



जगातील सर्वात लोकप्रिय ट्वेंटी-२० लीग म्हणजे आयपीएल. आयपीएल आपल्या आगामी हंगामाकडे कूच करत आहे. अशातच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी खेळाडूंसाठी एक मोठी घोषणा केली. आता क्रिकेटपटूंना प्रत्येक सामन्यासाठी तब्बल ७.५ लाख रुपये दिले जातील तसेच एका हंगामातील सर्व लीग सामने खेळणाऱ्या क्रिकेटपटूला त्याच्या कराराच्या रकमेव्यतिरिक्त १.०५ कोटी रुपये मिळतील. प्रत्येक फ्रँचायझी एका हंगामात मॅच फी म्हणून १२.६० कोटी रुपयांचे वाटप करेल.

बीसीसीआय सचिव जय शाह यांनी एक ऐतिहासिक घोषणा करताना खेळाडूंना खुशखबर दिली. आयपीएल लिलावात बहुतांश खेळाडूंना कोट्यवधी रुपये मिळत असतात. आता त्यांना मॅच फीच्या रुपातही मानधन मिळेल.

सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती देताना जय शाह म्हणाले की, इंडियन प्रीमिअर लीगमधील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीचा आनंद साजरा करण्यासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात येत आहे. आम्हाला कळवताना अतिशय आनंद होत आहे की, आमच्या क्रिकेटपटूंना प्रत्येक सामन्यासाठी मॅच फी म्हणून ७.५ लाख रुपये दिले जातील. प्रत्येक फ्रँचायझी मॅच फी म्हणून एका हंगामासाठी १२.६० कोटी रुपये खर्च करेल. आयपीएल आणि आमच्या खेळाडूंसाठी हे एक नवीन युग आहे.



# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अर्थसंकल्पात हवामान अर्थसंकल्प

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती; उपाययोजना सुरू

**पिंपरी : प्रतिनिधी**

पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महापालिका विविध उपक्रम राबवून उपाययोजना करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पर्यावरणपूरक उपक्रमांसाठी निधी उपलब्ध राहावा, याकरिता महापालिकेच्या अर्थसंकल्पात हवामान अर्थसंकल्प असा स्वतंत्र समावेश करण्यात येणार आहे.



याबाबतची अधिक माहिती देताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, जागतिक तापमानवाढ, अतिउष्णतेच्या तीव्र लाटा, ऋतुमानातील बदल याचा सर्वांगिण विचार करून, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वांगिण प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने महापालिका विविध उपक्रम राबवित आहे. कार्बन उत्सर्जन कमी करणे, हवा प्रदूषण करणाऱ्या घटकांवर निर्बंध घालणे, स्थानिक पर्यावरण सुधारणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांत शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी हवामान अर्थसंकल्प या संकल्पनेचा समावेश केला आहे. त्या अनुषंगाने आगामी अर्थसंकल्पात हवामान अर्थसंकल्पाचा समावेश केला जाणार आहे.

हवामान अर्थसंकल्पाच्या संकल्पनेसंदर्भात मार्गदर्शक ध्येय, धोरणे, उद्दिष्ट्ये, कार्यपद्धती, सूचना, अर्थसंकल्प माहिती संकलन नमुने याबाबत खासगी संस्थेमार्फत अभ्यास करण्यात येऊन सूचना घेण्यात आल्या. त्या धोरणांचा व मार्गदर्शक सूचनांचा महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये समावेश केला जाणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला आयुक्तांनी मान्यता दिली.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने विस्तारात आहे. शहराची लोकसंख्या ३५ लाखापर्यंत पोहचली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची लोकसंख्याही वाढत आहे. शहरातील वाहनांची संख्या २० लाख आहेत. शहराच्या चारही बाजूंनी मोठमोठे गृहनिर्माण प्रकल्प विकसित होत आहेत. त्यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

# माहिती तंत्रज्ञानाच्या उत्कृष्ट वापरासाठी महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे वीज ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देणे आणि दर्जेदार ग्राहक सेवेसाठी प्रभावी धोरणात्मक उपक्रम राबविल्याबद्दल महावितरणला द गव्हर्नन्स नाऊ या संस्थेतर्फे दोन प्रवर्गात राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली येथे हा पुरस्कार वितरण सोहळा झाला.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या कामकाजात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून ग्राहकांना पारदर्शक व गतिमान सेवा देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महावितरणकडून माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत ग्राहक सेवेत अधिक सुलभता आणणाऱ्या ऊर्जा चॅटबॉट व ईव्ही मोबाईल ॲपसाठी महावितरणला हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

महावितरणचे ऊर्जा चॅटबॉट २४ तास ग्राहकांच्या सेवेत आहे. ज्यामुळे वापरकर्त्यांना नवीन जोडणी अर्ज, तक्रार नोंदणी करणे, वीजबिल भरणे इ. सेवा सुलभपणे उपलब्ध झालेल्या आहेत. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत ग्राहकांना तत्परतेने, सुरक्षितरितीने माहिती प्रदान करून ग्राहकांचे समाधान करण्यात येत आहे.

महावितरणच्या इलेक्ट्रिक व्हेईकल उपक्रमासाठी मानव विरहित ईव्ही चार्जिंग स्टेशनच्या उभारणी व इलेक्ट्रिक व्हेईकल वापरकर्त्यांसाठी मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे. हे ॲप वापरकर्त्यांस चार्जिंग स्टेशन शोधणे व ई-वाहनांच्या व्यवस्थापनात मदत करते. हे ॲप महाराष्ट्रातील इलेक्ट्रिक व्हेईकल क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या वाढीला चालना देणारे ठरले आहे.

राष्ट्रीय पातळीवरील हे दोन्ही पुरस्कार महावितरणतर्फे महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) एकनाथ चव्हाण यांनी स्वीकारले. या यशाबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) अविनाश हावरे व माहिती तंत्रज्ञान विभागाचे अभिनंदन केले.




# जिल्हा रुग्णालयाच्या नव्या इमारत बांधकामासाठी निविदा प्रक्रिया सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नवीन इमारत बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे ई-निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. ८४ कोटी ८८ लाख ६५ हजार ५५४ रुपये अंदाजित रकमेची निविदा काढण्यात आली असून ७ ऑक्टोबर रोजी ई-निविदा उघडली जाणार आहे.

शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयाची जुनी इमारत पाडून रुग्णालयाची नवीन अद्यावत इमारत उभारण्याची मागणी अनेक वर्षे केली जात होती. यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे यांनी एकत्रित पुढाकार घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी पालकमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून शासन दरबारी पाठपुरावा केला.

शासनानेही अलिबाग जिल्हा रुग्णालयाच्या परिस्थितीबाबत सकारात्मक विचार करून ३०० बेडचे अद्यावत असे सात मजली रुग्णालयाला मंजुरी दिली आहे. यासाठी शासनाने जुलै महिन्यात १०५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. रुग्णालयाच्या नव्या इमारतीचे कामे लवकरात लवकर होण्यासाठी बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे यांनी वरिष्ठ विभागाकडे निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत प्रक्रिया सुरू केली होती. त्यानुसार ४ ऑक्टोबर ही निविदा भरावयाची अंतिम तारीख आहे. ७ ऑक्टोबर रोजी निविदा उघडण्यात येणार आहेत.

# अलिबाग खुटलवाडी येथे घर कोसळले

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील बामणगाव-खुटलवाडी आदिवासीवाडी येथील एक झोपडीवजा घर शनिवारी (दि.२८) कोसळले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अतिपावसामुळे घर कोसळले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

खुटलवाडी येथे अजय नाईक यांच्या मालकीचे घर आहे. ते कोसळले. घर कोसळले तेव्हा घरातील पाचही सदस्य जवळच राहणाऱ्या नातेवाईकांकडे गेले होते. त्यामुळे सर्वजण बचावले. घरातील कपडे, अंथरूणे व इतर वस्तूंचे भिजून नुकसान झाले आहे. तहसीलदार विक्रम पाटील यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी महसूल कर्मचारयांना घटनास्थळी भेट देऊन पाहणी करण्याचे तसेच नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले.



# कर्जत वडवली येथे चोरी; १५ लाखांचा ऐवज लंपास

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या वडवली येथील वसंत मोतीराम तळपे यांच्या घरात घुसून अज्ञात चोरट्याने लोखंडी कपाडाचे लॉक तोडून त्यामधील गळ्यातील गंठण, हार, चैन, दोन अंगठ्या, एक कानातील जोड, दोन हातातील बांगड्या अशी अंदाजे १९ ते २० तोळे सोन्याची चोरी केली आहे. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.

घरात चोरी झाल्याचे तळपे यांना सकाळी ९ वाजता समजले. नम्रता वसंत तलपे यांनी सकाळी ९ वा. कपाट खोलून पाहिले असता आतला लॉक तोडलेला दिसून आला. तेव्हा चोरी झाल्याचे समजले. लॉकर पाहिला तर तेव्हा समजले सोने पूर्ण नेले आहे. १६ तारखेला गळ्यातले गंठण वगैरे कपाटामध्ये ठेवली होती. सकाळी पाहिले तेव्हा लक्षात आले की, गळ्यातील गंठण, हार, चेन, दोन अंगठ्या, एक कानातील जोड, दोन हातातील बांगड्या असा एकूण १५ लाख रूपयांचा ऐवज चोरी झाला आहे.



चोराने कपाट उघडून आतील लॉकर तोडले व पुन्हा कपाट लावून चोर ऐवज घेऊन फरार झाला.

आठ दिवसामध्ये कधी चोरी झाली ते घरात माहिती नाही. सकाळी कपाट उघडून पाहिले तेव्हा हा चोरीचा प्रकार उघडकीस आला, असे तळपे यांनी सांगितले. नेरळ पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पान १ वरुन

### ॲडव्होकेट ॲक्ट सुधारणेसाठी प्रयत्न करणार

देशातील पहिली ॲडव्होकेट अकॅडमी आणि संशोधन केंद्र ही वास्तू आपल्या महाराष्ट्रात होत आहे याचा निश्चितच आनंद आहे. ही अकॅडमी समाजात सामाजिक, आर्थिक समानता आणण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावेल आणि न्यायसंस्थेसाठी मानचिन्ह ठरेल, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी येथे केले.

महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने ॲडव्होकेट अकॅडमी व संशोधन केंद्राची वास्तू लवकरच पूर्ण होईल. शासनाच्या सहकार्यातूनच राज्यात नागपूर, औरंगाबाद आणि मुंबई येथे लॉ युनिव्हर्सिटी साकारल्या जात आहेत. नागपूर येथील लॉ युनिव्हर्सिटीचे काम पूर्ण झाले असून तेथील कॅम्पस जागतिक स्तरावरील कॅम्पस बनले आहे. मुंबई लॉ युनिव्हर्सिटीचेही काम लवकरच सुरू होणार आहे, असे गवई यांनी सांगितले.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या अकॅडमीची जागतिक कीर्ती व्हावी, अशा शुभेच्छा दिल्या. इतर मान्यवरांनीही आपले विचार मांडले.

या समारंभासाठी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे माजी चेअरमन तथा विद्यमान सदस्य पारिजात पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सरकारी वकील व रायगड जिल्हा अधिवक्ता परिषदेचे अध्यक्ष संतोष पवार, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष व रायगड अधिवक्ता परिषदेचे उपाध्यक्ष मनोज भुजबळ, जिल्हा महामंत्री सुनील तेलगे, पनवेल अध्यक्ष राजेंद्र देशमुख आदींनी विशेष मेहनत घेतली.

या वेळी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष एस. प्रभाकरन, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष सुदीप पासबोला, सचिव आशिष देशमुख, नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त कैलास शिंदे, विधी व न्याय विभागाचे विधी सल्लागार व सहसचिव विलास गायकवाड, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अतिरिक्त पोलीस आयुक्त दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त पंकज डहाणे, तिरुपती काकडे, नवी मुंबई महापालिका उपायुक्त डॉ. राहुल गेठे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे सदस्य मोतीसिंग मेहता, मिलिंद पाटील, गजानन चव्हाण, मिलिंद थोबडे, वसंत साळुंके, अण्णाराव पाटील, हर्षद निंबाळकर, सतीश देशमुख, अविनाश भिडे, वसंतराव भोसले, जयंत जयभावे, सुभाष घाटगे, अनिल गोवारदिपे, विठ्ठल कोंडे-देशमुख, विवेकानंद घाटगे, डॉ. उदय वारुंजीकर, आसिफ एस कुरेशी, अविनाश आव्हाड, अहमदखान पठाण, अमोल सावंत, राजेंद्र उमप, पनवेल वकील संघटनेचे सचिव प्रल्हाद खोपकर, भूषण म्हात्रे यांच्यासह विधी व न्याय क्षेत्रातील नामवंत वकील, विधी शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

### रायगडसह कोकणच्या सर्वंकष औद्योगिक विकासाला गती देणार -उद्योगमंत्री सामंत

राज्यात उद्योग वाढावेत या दृष्टीने उद्योजकांना सबसिडीसह विविध सवलती आणि सुविधा प्रदान केल्या जात आहेत. विदेशातील उद्योजकांना राज्यात निमंत्रित करण्यासाठी औद्योगिक क्षेत्राला अत्यावश्यक असणारी पायाभूत सेवा सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता आणि काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याची शाश्वतता जपणे याला प्राधान्य दिले. याला अपेक्षित यश मिळाले आहे. गेल्या तीन महिन्यात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ७५ हजार कोटी रुपये झाली असून महाराष्ट्र देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य बनले आहे.

रायगड जिल्ह्यात ८३ हजार कोटींचा सेमी कंडक्टर प्रकल्प येत आहे तसेच विविध ५० हजार कोटींचे प्रकल्प येत आहेत. ३८ हजार कोटींची गुंतवणूक क्षमता असलेल्या दिघी पोर्टला मंजुरी मिळाली आहे. यामुळे भविष्यात रायगड जिल्हा उद्योग नगरी म्हणून ओळख निर्माण करेल, असेही मंत्री सामंत म्हणाले.

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती उपक्रमाद्वारे ३५ हजार जणांना रोजगार मिळाला हे उद्योग विभागाचे यश आहे. कोणताही प्रकल्प स्थलांतरित होत नसून उलट परकीय गुंतवणूक वाढत असल्याकडे मंत्री सामंत यांनी लक्ष वेधले.

खासदार सुनील तटकरे यांनी म्हटले की, राज्याच्या उद्योग विभागाने उत्तुंग भरारी घेतली आहे. गडचिरोलीसारख्या भागातदेखील औद्योगिक विकास होतोय, रोजगार निर्मिती होतेय ही जमेची बाजू आहे. राज्यात गुंतवणूक, रोजगार निर्मिती झपाट्याने होत आहे. ग्रामीण भागात उद्योगाचे जाळे विस्तारते आहे. सिडकोमुळे नवी मुंबई आणि परिसराचा विकास होतो आहे. अटल सेतूमुळे मुंबईशी जवळीक वाढली आहे. राज्यात सर्वंकष औद्योगिक विकास होतोय. मध्यम आणि लघु उद्योगाच्या भूमिपुत्र उद्योजकांनादेखील सवलती देण्याबाबत कार्यवाही करावी. राज्यातील वाढती गुंतवणूक ही राज्याच्या विकासासाठी फायदेशीर आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल. दक्षिण रायगड जिल्ह्यातदेखील मोठ्या प्रमाणात क्षमता आहेत. दिघी पोर्टमुळे या भागाच्या विकासाला गती मिळेल. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही खासदार तटकरे यांनी केले.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी, स्थानिक भूमिपुत्रांना लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रक्रियेत सामावून घेत नोकऱ्यांसाठी प्रथम प्राधान्य दिले गेले पाहिजे, अशी आग्रही भूमिका घेत सांगितले की, येत्या काही महिन्यांतच लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होईल. 'दिबां'च्या नावासाठी आम्हाला संघर्ष करावा लागला, पण विमानतळावर स्थानिक भूमिपुत्रांना आणि प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ येऊन देऊ नका, इथल्या स्थानिक भूमिपुत्रालाच या ठिकाणी नोकरीसाठी प्रथम प्राधान्य द्यावे, असे सांगितले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू यांचीही समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी केले, तर उपस्थितांचे आभार जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या यांनी मानले.

### माझी वसुंधरा ४.० अभियानात पनवेल महापालिका राज्यात पहिली

अभियानातील महत्त्वाच्या घटकांनुसार पर्यावरण रॅली, कार्यशाळा, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात आले होते. याचबरोबर मॅरेथॉन, स्वच्छता रॅली, सायकल रॅली घेण्यात आली.

अभियानातील महत्त्वाच्या घटकांना अनुसरून महापालिकेने १०० टक्के एलईडी पथदिवे लावले आहेत. वायूमधील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी पालिका विशेष प्रयत्न करत असून धूळशमन वाहन खरेदी केले आहे तसेच विविध इमारतींवर सोलार पॅनेल बसवून पालिकेने विजेचे बिल कमी केले आहे.

महापालिकेचा पर्यावरण विभाग करत असलेल्या विविध उपक्रमांबद्दल शासनाने हा पुरस्कार महापालिकेस देऊ केला असून आयुक्त मंगेश चितळे यांनी पर्यावरण विभागाच्या टीमचे कौतुक करून येत्या काळात पर्यावरणविषयक विविध कार्यक्रम राबविण्यावर भर देण्याबाबत सुचविले आहे.

> **निसर्गाच्या पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश पंचतत्वासोबत जीवन पद्धती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही आणि जैवविविधतेचेही अस्तित्व राहणार नाही. म्हणून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सोबत घेऊन तेथे या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करून शाश्वत निसर्गपूरक जीवनपद्धती अवलंबिण्यासाठी माझी वसुंधरा हे अभियान राबविण्यात येत आहे.**
> **-उपायुक्त डॉ. वैभव विधाते, पर्यावरण विभाग, पनवेल मनपा**

### खालापुरातील तीन ग्रामपंचायतींनाही पुरस्कार जाहीर

दोन हजार ५०० ते पाच हजार लोकसंख्या असलेल्या गटात खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीने कोकण विभागात पहिला व राज्यात सातवा क्रमांक प्राप्त केला असून साजगाव ग्रामपंचायतीने कोकण विभागात पहिला व राज्यात दहावा क्रमांक मिळवला आहे. यामुळे तांबाटी ग्रामपंचायतीला ५० लाख, तर साजगाव ग्रामपंचायतीला १५ लाख रुपये बक्षीस प्राप्त होणार आहे.

अभियानाच्या सुरुवातीपासून तत्कालीन कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेश भालेराव, खालापूर पंचायत समिती गटविकास अधिकारी संदीप कराड, माझी वसुंधरा उपक्रम कोकण विभाग तज्ञ अमोल पडळकर, पंचायत समिती अधिकारी यांनी ग्रामपंचायतींना मार्गदर्शन केले. संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी यांनी ग्रामपंचायत हद्दीत उपक्रम राबविण्यासाठी विशेष मेहनत घेतल्याने हे यश प्राप्त झाले आहे.

> **रायगड जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त वडगाव, तांबाटी, साजगाव ग्रामपंचायतींचे तसेच ग्रामसेवक, नागरिकांचे अभिनंदन! यापुढे जिल्ह्यात हवेचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष लक्ष पुरविण्यात येईल. वृक्षारोपण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौरऊर्जा दृष्टीने मोहीम राबविण्यात येईल. डिजिटल स्कूलच्या माध्यमातून शिक्षण अधिक दर्जेदार करण्यात येत आहे तसेच शाश्वत पर्यावरण चळवळ सक्रिय करण्यासाठी नागरिकांनी सहभाग नोंदवित योगदान द्यावे.**
> **-डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जि.प.**

# पनवेलच्या ग्रामीण भागात विकासकामांचा धडाका

## उसर्ली बुद्रुक येथे अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामांचा धडाका सुरू आहे. त्यानुसार सुमारे ३८ लाख रुपयांच्या निधीमधून उसर्ली बुद्रुक येथे रस्ते आणि गणेशघाट बांधण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि.२८) झाले.

पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे विकासकामांचा झंझावात सुरू आहे. त्यानुसार उसर्ली बुद्रुकमधील कामांसाठी आमदारांच्या प्रयत्नांमुळे निधी मंजूर झाला आहे. यामध्ये २० लाख रुपयांच्या निधीतून अखलाख शेख ते सिराज शेख यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण, १० लाख रुपयांच्या निधीतून उसर्ली येथे गणेश घाट तर आठ लाख ९९ हजार ९८६ रुपयांच्या निधीतून उसर्लीमधील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहेत. या तीनही कामांचे भूमिपूजन शनिवारी झाले.



या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, चिपळे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच प्रितेश डांगरकर माजी सरपंच नितिन काठावले, ग्रामपंचायत सदस्य किरण डांगरकर, बेबी ठाकूर, रेश्मा पाटील, माजी उपसरपंच संभाजी वारदे, लहु ठाकुर, माजी उपसरपंच शांताराम पोपेटा, मच्छिंद्र ठाकूर, बाळाराम ठाकूर, साईनाथ दळवी, सिताराम डांगरकर, वसंत काठावले, सुनील काठावले, बुधाजी काठावले, पांडुरंग काठावले, एकनाथ डांगरकर, दिपक पाटील, नरेश बेडेकर, गणेश दळवी, दशरथ डांगरकर, हनुमान बोलाडे, कृष्णा बेडेकर, लक्ष्मण लबडे, बाळाराम दळवी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात रोबोटिक प्रदर्शन उत्साहात




## अर्चना परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी प्राथमिक आणि इंग्रजी माध्यमिक यांच्या संयुक्त विद्यामाने शनिवारी (दि.२८) रोबोटिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या शाळा समिती प्रतिनिधी अर्चना ठाकूर या उपस्थित होत्या. प्रदर्शनात पाचवी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी अनेक नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर केले.

या वेळी संगणक तज्ज्ञ शितल कुलकर्णी, विभाग प्रमुख रोबोटिक अमेझेहेड्स मुंबई रूपाली मोरे, व्यवस्थापक रोबोटिक विभाग शशिकांत बारगोडे, उपध्याक्ष शिक्षक पालक संघटना इंग्रजी माध्यमिक विभाग सुधीर ठाकूर, सहसचिव श्रावणी वरेकर, उपध्याक्ष शिक्षक पालक संघटना सोनाली शिंदे, सहसचिव प्रतिक्षा सांगोळ हे प्रमुख म्हणून लाभले.

प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गायत्री पाटील आणि साक्षी पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शिक्षक आणि रोबोटिक विभागतील शिक्षक प्रवीण चव्हाण यांनी यशस्वीपणे केले.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी, आजचे युग हे एआयचे युग आहे. तंत्रज्ञानाच्या बाबातीत जग आज पुढे चाललेले आहे. त्यामुळे या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळतो, असे सांगितले.

प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर म्हणाल्या की, आजच्या तंत्रज्ञान युगात प्रत्येक विद्यार्थ्याने तंत्रज्ञानात निपुण असणे फार आवश्यक आहे. शालेय पातळीवर अशा प्रकारचे उपक्रम होणे ही फार स्तुत्य बाब आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अशाप्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमीच प्रोत्साहन देत असतात, असेही त्या म्हणाल्या. प्रदर्शनात एकूण २० प्रकल्प सादर करण्यात आले.

# पनवेल मनपातर्फे माहिती अधिकार दिनानिमित्त कार्यशाळा उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये माहितीचा अधिकाराबाबत कार्यशाळेचे आयोजन शुक्रवारी (दि.२७) करण्यात आले. प्रमुख वक्ते प्रा. बापुराव बनसोडे यांनी माहिती अधिकाराबाबत अभ्यासपूर्ण माहिती उपस्थितांना दिली.

या वेळी उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, अधीक्षक दशरथ भंडारी, मनोज चव्हाण, राजेश डोंगरे, महापालिका अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख वक्ते बापूराव बनसोडे यांनी माहिती अधिकाराची सुरुवात करण्यामागील हेतू, त्याची गरज याबाबत विस्तृत माहिती दिली. माहिती अधिकारांतर्गत येणाऱ्या आस्थापना, सार्वजनिक आस्थापना, अशासकीय संघाटनांमध्ये माहिती कशा पध्दतीने विचारावी याबाबत माहिती दिली. माहिती अधिकाराच्या अनुषंगाने येणारी कलमे, अधिनियमाबाबत माहिती दिली. त्यांची उत्तरे देताना घ्यायची काळजी याची माहिती दिली. लोकशाही टिकविण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना माहिती मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# न्हावाशेवा वाहतूक पोलिसांची अवजड वाहनांवर कारवाई



सात महिन्यांत २१ लाखांचा दंड वसूल

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदर परिसरातील व जेएनपीए-पनवेल महामार्गासह मुंबई जोडणाऱ्या न्हावा-शिवडी अटल सेतू महामार्गावर बेकायदेशीर उभ्या असलेल्या आणि महामार्गांवर वाहतुकीस अडथळा निर्माण करून अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या अवजड वाहनांवर न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर यांच्या पोलीस पथकाने मागील सात महिन्यांपासून या न्हावाशेवा वाहतूक पोलिसांनी १,८५३ अवजड वाहनांवर कारवाई केली असून सुमारे २१ लाख रुपयांचा दंड वसुल केला आहे.

याशिवाय सुरक्षेच्या दृष्टीने महामार्गांवर अवजड वाहनांची पार्किंग न करण्याचे आवाहनही अवजड वाहन चालकांना करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जे एनपीएने सुरक्षित व सुलभरीत्या सुरू करण्यात आलेल्या पार्किंगमध्ये आपापली वाहने पार्किंग करण्याबाबत व सुरक्षेविषयी जी. एम. मुजावर यांनी प्रबोधन केले.

या जेएनपीए परिसरात केंद्र शासनाने सहा व आठ पदरी महामार्ग साकारले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी आता विशेषतः जाणवत नाही, मात्र रात्रीच्या वेळी अवजड वाहनचालक बेशिस्त वाहन चालवीत असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई सुरूच ठेवण्यात आल्याने वाहनचालकांनी शिस्तीने योग्यतेने वाहन चालविणे पसंत केले असल्याचे जाणवत आहे.

# अमरधाम परिसरात पेव्हरब्लॉक बसविल्याने दिलासा

**पनवेल : वार्ताहर**

माजी उपमहापौर विक्रांत पाटील यांनी तत्परतेने अमरधाम परिसरात निघालेले पेव्हरब्लॉक तेथील रहिवाशी त्याचप्रमाणे पोलिसांनी केलेल्या तक्रारीवरून बसवून रस्ता खड्डेमुक्त केल्याने वाहनचालकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

वडाळे तलाव परिसरातील अमरधामच्या पाठीमागील रस्त्यावर काही ठिकाणी पेव्हरब्लॉक निघाल्याने खड्डा बनला होता व सततच्या पावसामुळे खड्ड्यांचा अंदाज न आल्याने येथून जाणाऱ्या दुचाकी व रिक्षाचालकांना कसरत करावी लागत असून अपघात होत असतात. ही बाब तेथील पोलिसांच्या लक्षात आली व त्यांनी तत्काळ याबाबतची माहिती



माजी उपमहापौर विक्रांत पाटील यांना दिली. त्यांनी या तक्रारीची तत्परतेने दखल घेत निघालेले पेव्हरब्लॉक नव्याने बसवून घेतले, तसेच परिसरात असणारे खड्डे बुजविल्याने वाहनचालकांना होणारा त्रास आता वाचला आहे. त्यामुळे चालकांनी विक्रांत पाटील यांचे आभार मानले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी संशोधन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२८) रिसर्च अविष्कार समितीतर्फे विद्यार्थ्यांसाठी संशोधनावर सत्राचे आयोजन केले होते.

या सत्राचा प्रमुख उद्देश मुंबई विद्यापीठाच्या रिसर्च आविष्कार स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना संशोधनाविषयी तसेच संशोधनाचे वेगवेगळे विषय ज्ञात व्हावा हा होता.

या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून महात्मा फुले महाविद्यालय पनवेल प्रा. हणत शेख व प्रा डॉ. गिरीश गुंड यांनी उपस्थित राहून महाविद्यालयाचे सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना संशोधनातील बारकावे, वेगवेगळे विषय, सादरीकरण याविषयी मार्गदर्शन केले.

प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना या सत्रासाठी प्रोत्साहन दिले व सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या सत्राचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच रिसर्च अविष्कार समितीतील इतर सर्व सदस्य तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# धनुर्विद्या स्पर्धेत ‘सीकेटी’च्या सर्वेशचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिकेतर्फे द्रोण अकॅडमी व कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी पनवेल येथे झालेल्या जिल्हास्तरीय धनुर्विद्या (आर्चरी) कंपाउंड स्पर्धेमध्ये नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयातील सर्वेश निवास थळे याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

त्याची विभागीय आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशचे अभिनंदन केले आहे.

# ‘एक झाड आईच्या नावे’ अंतर्गत वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत एक झाड आईच्या नावे उपक्रमाच्या माध्यमातून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी (दि.२७) चारही प्रभागांमध्ये करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत महापालिकेने सुमारे साडेसहा हजार झाडे रोपण करण्याचा निश्चय केला आहे. याची सुरुवात शुक्रवारपासून करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमास घनकचरा व स्वच्छता विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने, विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक, सर्व आरोग्य निरीक्षक, त्या त्या परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, विविध शाळांचे विद्यार्थी, एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अनोखा उपक्रम

***वृक्षारोपण उपक्रमादरम्यान रोपण करण्यात आलेल्या झाडांवर आठवण म्हणून छोट्याशा फलकावर त्या झाडाचे नाव, वृक्षारोपण केलेल्या व्यक्तीचे अगर विद्यार्थ्यांचे नाव, त्याच्या आईचे नाव, शाळेचे नाव लिहिण्यात आले आहे.***



# शिवकर शाळेच्या नवीन इमारतीसाठी ११ लाखांची देणगी

## आमदार प्रशांत ठाकूर यांची घोषणा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी ब्लॉकस्टर म्युझिकल इव्हनिंग कार्यक्रमात शिवकर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेच्या नवीन इमारतीसाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि परिवाराच्या वतीने ११ लाख रुपयांची देणगी देण्यात येणार आहे. ही देणगी आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाहीर केली.

रोटरी क्ल ऑफ पनवेल चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शिवकर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेच्या नवीन इमारतीसाठी फंड रेजिंग करण्याच्या दृष्टीकोनातून बॉलिवूड ब्लॉकबस्टर्स म्युझिकल इव्हनिंग कार्यक्रम शुक्रवारी (दि.२७) आयोजित करण्यात आला होता.


आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमाला डॉ. गिरीश गुणे, डॉ. प्रमोद गांधी, डॉ. जय भंडारकर, चारुदत्त भगत, अरविंद सावळेकर, वर्षा प्रशांत ठाकूर, उद्योजक विलास कोठारी, ऋग्वेद कांडपिले, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे यांच्यासह उपस्थित होते.

या कार्यक्रमात शाळेच्या इमारतीसाठी रोटरी क्लब पनवेलकडे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि मनपा माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी ११ लाख रुपये तर डॉ. जय भंडारकर यांनी पाच लाख रुपयांची देणगी जाहीर केली. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेक दानशूर व्यक्तींनी देणगी जाहीर केली. त्याबद्दल शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे यांनी सर्वांचे आभार मानले.










# थ्री डीचा चष्मा चाळीशीचा झाला...





झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

आपण पिक्चरला गेल्यावर थिएटरचा डोअर किपर अर्धे तिकीट कापून घेऊन उरलेले देताना त्यासोबत एक विशिष्ट चष्मा देतो आणि तो लावून चित्रपट पाहताना पडद्यावरच्या गोष्टी आपल्या समोरच घडताहेत असे वाटते....

त्री मिती अर्थात थ्री डायमेन्शन (थ्री डी) चित्रपटाशी आपण चित्रपट रसिकांची झालेली पहिली ओळख. या ओळखीला तब्बल चाळीस वर्ष पूर्ण झालीदेखील.

आपण पाहिलेला पहिला थ्री डी चित्रपट छोटा चेतन (मुंबईत रिलीज सप्टेंबर १९८४). मूळ तमिळ भाषेतील हा चित्रपट हिंदीत डब होऊन आल्यावर हा चष्मा नेमका कोणता? यापासून तो लावून पडद्यावर अडीच तीन तास पाहिल्यावर काही त्रास तर होणार नाही ना? डोकेदुखी तर होणार नाही ना अशा केवढ्या शंका, प्रश्न काही विचारू नका आणि ते स्वाभाविक होतेच. पडद्यावरच्या जगात हरखून/हरवून जाण्याची आपली चित्रपट प्रेक्षक संस्कृती. चित्रपटगृहाच्या अंधारात एकदा का पडद्यावर गोष्ट सुरू झाली की त्यातील गीत संगीत व नृत्य आणि संवाद यातून रमायचे हीच आपली पद्धत. चित्रपट आवडला तर तो डोक्यावर घेत डोक्यात फिट करायचा आणि आवडला नाही तर तो तसाच पडद्यावर ठेवून बाहेर पडायचे असे आपले आपले सोपे समिकरण. त्यात आता हा चष्मा लावून पडद्यावर पाह्यचे तर चष्मा सांभाळायचा की पिक्चरमध्ये काय चाललंय यात मग्न व्हायचे असा प्रश्न. त्यात भर मूळ तमिळ भाषेतील चित्रपट. त्या काळात दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपट फारसे आपले वाटत नसत. त्यांची हिंदी रिमेक जमली असेल तर ते चित्रपट स्वीकारले जात. (प्यासा सावन, एक दुजे के लिए, हिम्मतवाला, सदमा ही काही उदाहरणे.) छोटा चेतन या नावातच यात बालनायक हिरो असणार हे उघड होते.

थ्री डायमेन्शन म्हणजे काय याची मुद्रित माध्यमातून दखल घेतली गेल्याने चित्रपट पाहण्याचे (एन्जॉय करण्याचे) एक आधुनिक तंत्र आले आहे याची जाणीव झाली. त्या काळातील चित्रपटविषयक लेखनात प्रबोधनही असे (आज त्याची जागा प्रमोशनने घेतली आहे हे जनसामान्य जाणून आहेत).

'छोटा चेतन'चे मुंबईतील मेन थिएटर मेट्रो होते. असं काही विशेष असेल तर त्यासाठी मेट्रो चित्रपटगृह हुकमी. संगीतम श्रीनिवास राव दिग्दर्शित पुष्पक या संवादरहित चित्रपटाचे मेन थिएटर मेट्रोच होते. मेट्रोत सुरुवातीपासूनच गुरुवारी नवीन चित्रपट प्रदर्शित होतोय. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांना मात्र वरळीतील सत्यम चित्रपटगृहाचे शुक्रवारचे फर्स्ट शोचे तिकीट दिले. एका नवीन अनुभवाला सामोरे जाण्याची मानसिक तयारी झाली होती. चित्रपट पाहणे म्हणजे तिकीट काढून आत गेलो असे अजिबात नसते आणि त्या हाऊसफुल्ल गर्दीतील एक होऊन आपण चित्रपट पाहत असतो. चित्रपट हे समूहातील एक बनून एन्जॉय करण्याचे एक माध्यम.

चष्मा लावताना समिक्षकाचा चष्मा काढून ठेवायचा का हा प्रश्न असला तरी मी समिक्षकाचा चष्मा कधीच लावला नसल्याने थ्री डीचा चष्मा पटकन फिट बसला आणि पडद्यावर नजर सेट झाली. पहिली काही दृश्ये अवघडलेपण वाटले. अचानक डोळ्यासमोर काही आल्याने दचकून व्हायला झाले. हळूहळू पडद्यावरच्या जगात रमलो. नवीन तंत्र आवडले. एक थ्रीलिंगफुल अनुभव वाटला. पब्लिक रिपोर्टही सकारात्मक होता. बच्चेकंपनी अतिशय खुश होऊन सत्यमबाहेर पडत होती. पिक्चर हिट होणार याचेच हे लक्षण होते. नेहमीच चित्रपट रसिकांच्या आवडीनिवडीवर चित्रपटाचे यशापयश ठरलयं.

...पिक्चर सुपर हिट म्हणजे अनेक आठवड्यांचा हुकमी मुक्काम. आपल्या देशात रंगीत दूरदर्शन व व्हिडीओ यांचे १९८२च्या एशियाडच्या वेळेस आगमन होताच नवीन चित्रपट प्रदर्शित होताच रात्रीपर्यंत त्याची चोरट्या मार्गाने व्हिडीओ कॅसेट यायची आणि त्याचा जोरदार फटका चित्रपटगृहांना बसत होता. त्याला एक उत्तर म्हणून हे थ्री डायमेन्शन चित्रपट तंत्र आहे असाही एक निष्कर्ष काढण्यात आला. चित्रपटाच्या यशापयशाच्या नोंदीच्या अलिकडे पलिकडे बरेच काही असतेच असते...

आता जो हिट है वो फिट्ट है अशा अलिखित नियमानुसार थ्री डायमेन्शन चित्रपट निर्मितीत वाढ अपेक्षित असली तरी ती सोपी अजिबात नव्हती. कारण असे चित्रपट दाखविण्यात थिएटर प्रोजेक्शनमध्ये करावे लागणारे काही बदल हे एक सुरू होण्याअगोदर प्रेक्षकांना चष्मा द्या आणि संपल्यावर ते जमा करा. त्याची काळजी घ्या. यात वेळ जात होता आणि थिएटरला अधिक स्टाफ हवा होता. मोठ्या शहरात हे जमून जायचं, पण छोट्या शहरात आणि ग्रामीण भागात हे चित्रपट दाखवणे अधिकच आव्हानात्मक होते. मुळात अशा चित्रपटांच्या चित्रीकरणापासून आव्हाने होती.

बालप्रेक्षकांना आवडेल अशीच कथा पटकथा हवी. 'शिवा का इन्साफ'ची तशी होती आणि दिग्दर्शक राज एन. सिप्पी याने गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील आपल्या चित्रपटाच्या सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांना आवर्जून आमंत्रित केले. तेव्हा जॅकी श्रॉफ व पूनम थिल्लॉन यांच्यावर एक दृश्य चित्रीत होत असतानाच वारंवार होत असलेले रिटेक हे नवीन तंत्रज्ञान सोपे नाही हे तर सांगत नव्हते ना? छायाचित्रणकार अशोक मेहता अतिशय मेहनतीने कॅमेऱ्यात मग्न होता आणि या अनुभवाचे रिपोर्टिंग केले. प्रत्यक्षात चित्रपटसृष्टीतील भटकंतीमधील माझे लाईव्ह अनुभव असे केवढे तरी विविधांगी आणि इस्टमनकलर.

शिवा का इन्साफ, महाशक्तीमान, सामरी असे काही थ्री डायमेन्शन चित्रपट पडद्यावर आले, पण त्यांना फारसे यश प्राप्त झाले नाही. चष्म्यातून चित्रपट पाहण्याचे नाविन्य राहिले नव्हते ना... नव्वदच्या दशकात छोटा चेतन मध्ये उर्मिला मातोंडकरचे फक्कड नृत्य समाविष्ट करुन रिपीट रनला प्रदर्शित करण्यात आला. (रिपीट रन प्रथेत थ्री डी पिक्चरही) गोरेगावच्या सम्राट थिएटरच्या नूतनीकरणानंतरचा हा पहिला चित्रपट.

कालांतराने मल्टीप्लेक्स युगात आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रोजेक्शन आणि त्याबरोबरच ग्लोबल युगातील डिजिटल पिढी या सगळ्यात थ्री डायमेन्शन चित्रपटाचे सातत्य दिसतेय. मराठीतील पहिला थ्री डायमेन्शन चित्रपट निर्माण करण्याचे श्रेय महेश कोठारेंना. झपाटलेला चित्रपटाची सिक्वेल अर्थात पुढचा भाग झपाटलेला २ हा मराठीतील पहिला थ्री डायमेन्शन चित्रपट.

मल्टीप्लेक्स युगातच रमेश सिप्पी दिग्दर्शित सर्वकालीन बहुचर्चित 'शोले'वर तांत्रिक सोपस्कार करून चित्रपट थ्री डायमेन्शन करण्यात आला आणि मला चित्रपट समीक्षकांना आवर्जून मल्टीप्लेक्समध्ये दाखवला, तेव्हाही गब्बरसिंगची तीच दहशत आणि दरारा.

मल्टीप्लेक्स युगात थ्री डायमेन्शन चित्रपटात विविधता केवढी तरी. विदेशी चित्रपट (अवतार इत्यादी), दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपट हिंदीत डब (बाहुबली, आरआरआर वगैरे), हिंदी सायन्स फिक्शन (रा. वन.ळ, २.०), थ्रीलर (निमल), पौराणिक पाश्र्वभूमी (हनुमान, आदिपुरुष, कल्की २८९८), ऐतिहासिक चित्रपट (तान्हाजी, पद्मावत), भूतपट (भेडिया, भूत रिटर्न) , रहस्यरंजक (राज ३, भोला, हॉन्टेड), पिरियड चित्रपट (८३) वगैरे वगैरे. चित्रपटाची निर्मिती बजेट अवाढव्य झाली, एकेका चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दद्त एकादा प्रादेशिक भाषेतील चित्रपट नक्कीच निर्माण होईल, मोठ्याच प्रमाणावर देश विदेशातील प्रदर्शन, बिग स्क्रीनवरील अफाट महामनोरंजन, चित्रपट म्हणजे अवाढव्य आर्थिक उलाढाल अशा वातावरणात थ्री डायमेन्शन चित्रपट आता रुळलेत.

एका मोठ्याच प्रवासानंतरचे हे यश आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा हा प्रत्यय आहे. एकेकाळी काही मध्यमवर्गीय चित्रपटगृहात पडद्यावर भुरकट चित्र दिसे आणि मोनो साऊंड सिस्टीममुळे आवाजात दोष असे. तरीही जनसामान्य प्रेक्षकांनी अनेक चित्रपट डोक्यात फिट केले, डोक्यावर घेतले. त्याचीच गोड गोड गोड फळे आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल वातावरणातील चित्रपटसृष्टीला मिळताहेत.

थ्री डायमेन्शन चित्रपट चाळीस वर्षांनंतर कुठे?

याचे सकारात्मक उत्तर, प्रचंड प्रगतिपथावर असेच आहे.

चित्रपट माध्यमाचा प्रवास बायस्कोप, मूकपट असा सुरू होऊन तो बराच पुढे चाललाय. त्यात चित्रपटाचा दर्जा तो काय हो हा मात्र गंभीर विषय ठरेल.

# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून जलसंधारण!



राज्यामध्ये पडीक जमिनीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. या पडीक जमिनीचा विकास करून ग्रामीण जनतेला रोजगार, उपजीविका, आर्थिक स्तर उंचावणे व त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे यावर भर देण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये योग्य प्रकारे मृद संधारणाची कामे करून जमिनीची उत्पादकता वाढविणे या उद्देशाने केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० हा प्रकल्प राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

विविध क्षेत्राच्या विकासाबरोबरच पडिक जमिनींचा विकास करुन त्या सिंचनाखाली आणणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून देशाच्या आर्थिक विकासात भर पडणार आहे. यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. राज्यात या योजनांची अंमलबजावणी सन २०२५-२६पर्यंत प्रभावीपणे करण्याचे नियोजन करण्यात आले असून सद्य:स्थितीत २२ हजार ७३३ लक्ष रुपये किमतीची ९७९५ कामे सुरु झाली असून ७,९०२ कामे १७ हजार १६२ लाख रुपये खर्चून पूर्ण झाली आहेत.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० ही योजना राज्यात राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण ६०:४० टक्के आहे. या योजनेची राज्यात सन २०२१-२२पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत एकूण १४० प्रकल्प कार्यान्वित आहेत.

योजनेची संक्षिप्त माहिती -सन २०२१-२०२२पासून कार्यक्रम अंमलबजावणी सुरू झाली आहे.राज्याकरिता मंजूर प्रकल्पामधून पाच लाख ६५ हजार १८६ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. सध्याची प्रकल्प संख्या १४० आहे. यामध्ये एकूण ३० जिल्ह्यातील १०२ तालुके, १०३० ग्रामपंचायती, १६०३ गावे समाविष्ट आहेत. या प्रकल्पाचे एकूण प्रकल्पमूल्य रु. १३३५.५६ कोटी आहे. योजनेचे निधी प्रमाण केंद्र : राज्य ६०:४० असे आहे.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना -पाणलोट विकास घटक २.०च्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१नुसार राज्यस्तरीय मान्यता समिती, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा, राज्यस्तरीय तांत्रिक समिती व जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र गठित करण्यात आलेली आहे तसेच पाणलोट समिती गठित करण्यात आलेली आहे.

प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा -राज्यातील एकूण १४० प्रकल्पांसाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून पुढीलप्रमाणे जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांच्यामार्फत कृषी विभाग ८६, मृद व जलसंधारण विभाग ४५, वन विभाग दोन, जिल्हा परिषद चार, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा दोन व इतर एक अशा प्रकारे एकूण १४० प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन -या योजनेंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत नैसर्गिक संसाधनाशी संबंधित मालमत्ता निर्मिती, मालमत्तेची देखभाल, भौतिक कामांची देखभाल वृक्षारोपणासारख्या जैव कामांसाठी मजबूत संरक्षण उपाय, ही कामे केली जातात, याकरिता योजनेच्या प्रकल्प मूल्याच्या ४७ टक्के निधीची तरतूद आहे.

सद्य:स्थितीत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत रक्कम ४९,५४३ लाख रुपयांच्या २२,६७१ कामांना तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच ४९,२६१ लाख रुपयांच्या २२,१७७ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी २२७३३ लाख रुपयांची ९,७९५ कामे सुरु झालेली असून १७,१६२ लाख रुपये रक्कमेची ७,९०२ कामे पूर्ण झालेली आहेत.

नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत आतापर्यंत १५६४८ लाख रुपये खर्च झालेला आहे. प्रकल्पाचा कालावधी २०२१-२२ ते २०२५-२०२६ असा असून मार्च २०२६मध्ये या प्रकल्पाचे काम पूर्ण होणे आपेक्षित आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार टप्याटप्याने खर्च करणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

**-दत्तात्रय कोकरे,**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**

# जागतिक हृदय दिन विशेष : आरोग्याच्या वाढत्या समस्या



देशात घातक आजार, मानसिक ताणतणाव, घटते आयुर्मान आणि अकाली मृत्यू यामध्ये आपल्या आधुनिक जीवनशैलीचा विशेष वाटा आहे. आधुनिक जीवनशैली जगणाऱ्या तरुणांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता जास्त असते. आजकाल खेळताना चक्कर आल्याने पडण्याच्या घटना लहान मुलांपासून ते किशोरवयीन मुलांपर्यंत पहायला व ऐकायला मिळतात. लोक बसल्या बसल्या खाली कोसळतात आणि अनेक वेळा त्वरित आवश्यक आपत्कालीन वैद्यकीय मदतीअभावी जीव गमावतात. हृदयविकाराच्या समस्या फार वाढल्या आहेत.

आज आपण ते खातो-पितो जे प्राण्यांनाही खाण्यास योग्य नाही. आपल्या पारंपरिक खाद्यपदार्थांची जागा पाश्चात्य फास्ट फूड, जंक फूड आणि अस्वास्थ्यकर आहाराने घेतली आहे. लहानशा जिभेच्या चवीसाठी आपल्या संपूर्ण शरीराला इजा होते. आपण चवीच्या आधारावर खाद्यपदार्थ निवडतो हे खूप दुर्दैवाची गोष्ट आहे, जेव्हा की हे नेहमी आरोग्याच्या आधारावर असले पाहिजेत. अनेकदा असे दिसून येते की बहुतेक लोक पोट भरण्यासाठी खातात, परंतु ते किती कॅलरीज, कोणत्या प्रकारात आणि कोणत्या गुणवत्तेत घेत आहेत, शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण सतत वाढत आहे आणि पचनसंस्था कमकुवत होत आहे याचा विचार करीतच नाही. अन्नात आवश्यक पोषक तत्वांचा अभाव, अस्वच्छता, अशुद्ध हवा व पाणी, पुरेशी झोप न होणे, वाढते वजन, व्यायामाचा अभाव, अशुद्ध वातावरण, गोंगाट, कामाचा ताण, घरगुती कलह, मानसिक ताणतणाव, अमली पदार्थांचे व्यसन यामुळे आजार झपाट्याने वाढत आहेत. मानवी शरीर मागील दशकाच्या तुलनेत कमकुवत असल्याचे दिसते, आता हवामानात बदल होताच विविध रोगांचा प्रादुर्भाव मानवी शरीरावर लवकर होतो, कारण रोगप्रतिकारक शक्ती कमी होत आहे.

तळलेले पदार्थ, प्रक्रिया केलेले पदार्थ, प्रक्रिया केलेले मांस, जास्त साखर असलेले पदार्थ आणि पेये, चरबीयुक्त पदार्थ, खारट पदार्थ, सोडा, मैदा, जास्त मलाईयुक्त डेअरी उत्पादने, आइस्क्रीम, ट्रान्स फॅट्स, लोणी, लाल मांस, बटाटा चिप्स, फ्रेंच फ्राईज, कुकीज, पाम तेल, पिझ्झा, बेक केलेले पदार्थ, पांढरा ब्रेड, पास्ता, सॉसेज, पॉलिश्ड धान्ये, कॅन केलेला सूप किंवा खाद्य कंपन्यांचे प्रक्रिया केलेले पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहेत, कारण ते आपल्या आवश्यक पोषक तत्वांच्या गरजा पूर्ण करत नाहीत, ते वापरले नाही तर चांगले आहे. परंतु आपण साखर आणि मीठ वापरणे थांबवू शकत नाही, परंतु ते मर्यादित करणे किंवा त्यांचा इतर योग्य पर्याय वापरणे आवश्यक आहे. हे पदार्थ शरीरात स्लो पॉयझन म्हणून काम करतात आणि शरीरात सातत्याने वाढत असलेले वाईट घटक जेव्हा मर्यादेच्या पलीकडे जातात तेव्हा ते मानवी अवयव निकामी करू लागतात आणि त्याचे रूपांतर प्राणघातक आजारांमध्ये होते.

भारतातील बहुसंख्य मृत्यू आणि अपंगत्वासाठी हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग जबाबदार आहेत. २०२२मध्ये भारतीयांमध्ये हृदयविकाराच्या झटक्यांमध्ये १२.५ टक्के वाढ झाली आहे. अस्वास्थ्यकर आहार, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टेरॉल, मधुमेह आणि जास्त वजन यासह हे धोके आता देशातील एकूण आजारांच्या ओझ्यापैकी एक चतुर्थांश आहेत. देशातील एकूण मृत्यूंपैकी ६० टक्क्यांहून अधिक मृत्यूसाठी असंसर्गजन्य रोग जबाबदार आहेत. हृदय आणि फुफ्फुसाचे आजार, पक्षाघात, कर्करोग आणि मधुमेहामुळे दरवर्षी सुमारे ५.८ दशलक्ष भारतीय आपला जीव गमावतात. कर्करोग आणि मधुमेहाच्या वाढत्या प्रवृत्तीसह हृदयविकार हे दोन दशकांहून अधिक काळ भारतातील मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. २०२१मध्ये जागतिक स्तरावर सर्वात मोठा किलर हा इस्केमिक हृदयरोग होता, जो जगातील सर्व मृत्यूंपैकी १३ टक्के मृत्यूसाठी जबाबदार ठरला.

२०२२मध्ये भारतातील सरासरी आयुर्मान ६७.७४ वर्षे होते. २०२३पर्यंत मोनॅकोमधील पुरुष आणि महिलांचे आयुर्मान अनुक्रमे ८४ आणि ८९ वर्षे होते, तर दक्षिण कोरिया, हाँगकाँग, मकाऊ आणि जपानमधील पुरुष आणि स्त्रिया ८१ आणि ८७ वर्षे होती. ग्रामीण भागातील १७ टक्के वृद्धांना आणि शहरी भागातील २९ टक्के वृद्धांना जुनाट आजार आहेत. सर्व जुनाट आजारांपैकी ६८ टक्के उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचा वाटा आहे. पाश्चिमात्य देशांपेक्षा भारतात १०-१५ वर्षे आधी हृदयविकार आढळतो हे खूप आश्चर्यकारक आहे. भारतातील मृत्यूंपैकी २४.८ टक्के मृत्यू हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांमुळे होतात. त्यानंतर श्वसनाच्या आजारांमुळे १०.२ टक्के मृत्यू होतात, तर घातक आणि इतर ट्यूमरमुळे ९.४ टक्के मृत्यू होतात. २०१९मध्ये प्रदूषणामुळे भारतात २.३ दशलक्षाहून अधिक अकाली मृत्यू झाल्याचे लॅन्सेट अभ्यासात आढळून आले आहे. युनिसेफ आणि अन्न व कृषी संघटनेच्या अहवालानुसार भारतातील ४५ टक्के मुले अविकसित आहेत आणि दरवर्षी पाच वर्षांखालील सहा लाख मुलांना अपुरा शुद्ध पाणीपुरवठा, पौष्टिक आहाराचा अभाव आणि अस्वच्छ परिस्थितीमुळे जीव गमवावा लागतो. शुद्ध पाण्याअभावी दरवर्षी सुमारे दोन लाख मृत्यू होतात.

अमेरिकेसह ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, चीन, ब्राझील आणि इंडोनेशियासारख्या देशांपेक्षा भारतात तणावाची पातळी जास्त आहे. आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्सच्या २०२३ इंडिया वेलनेस इंडेक्स अभ्यासानुसार भारतातील प्रत्येक तिसरा व्यक्ती तणावाचा सामना करत आहे. अहवालात असे म्हटले आहे की ७७ टक्के भारतीयांना नियमितपणे तणावाचे किमान एक लक्षण जाणवते. भारतात मानसिक आरोग्य व्यावसायिकांची तीव्र कमतरता आहे, प्रति एक लाख लोकांमागे केवळ ०.०७ मानसोपचारतज्ज्ञ आणि ०.१२ मनोचिकित्सक परिचारिका आहेत. बऱ्याचदा या व्यावसायिकांना नैराश्याचा सामना करण्यासाठी थोडेफार किंवा कोणतेही प्रशिक्षण नसते. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन २०२४नुसार भारतीय लोकांमध्ये जगात सर्वाधिक लोक आहेत जे दर आठवड्याला सरासरी ४५ तासांपेक्षा जास्त काम करतात, विशेषतः खासगी संस्था आणि व्यवसायांमध्ये. यामध्ये आपला देश भूतान, लेबनॉन, लेसोथो, संयुक्त अरब अमिराती आणि पाकिस्तान या देशांच्या मागे आहे.

मोठमोठ्या कारखान्यांमधून निघणारे विषारी पाणी आणि धूर आजूबाजूचे वातावरण विषारी करतात. शेतात हानिकारक रासायनिक खतांचाही मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. अलीकडेच एका नवीन अभ्यासातून असे समोर आले आहे की, जगात सर्वाधिक प्लास्टिकचे प्रदूषण भारतातून होत आहे. देशात सर्व प्रकारच्या प्रदूषणाचीही गंभीर समस्या आहे. हानिकारक कचरा आणि भेसळ या गंभीर समस्येतही आपण अग्रेसर आहोत. शहरातील रस्त्यांवर लोकांपेक्षा जास्त वाहतूक कोंडी दिसून येते. बहुतांश राज्यांमध्ये भंगार असलेल्या सरकारी बसेस आणि स्थानिक प्रशासनाकडून चालवल्या जाणाऱ्या बसेसही प्रदूषण करतात. शहरांमधून वाहणाऱ्या बहुतांश नद्या ह्या नाल्यांच्या रूपात दिसतात. बांधकाम साइट्स आणि फॅक्टरी क्षेत्रातील बहुतेक कामगार धुळीच्या वातावरणात सुरक्षा साधन व मास्कशिवाय काम करतात. घटणारी जंगले, वाढती काँक्रीटची जंगले, कचऱ्याचे ढीग, ग्लोबल वॉर्मिंग यामुळे सजीवांना धोका निर्माण झाला आहे. वर्षभर हवामानाची परिस्थिती क्षणोक्षणी बदलत राहते, त्यामुळे वर्षभर आजार सुरूच राहतात आणि देशात आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा असूनही रुग्णालये सतत रुग्णांनी भरलेली असतात.

आता याला नियमांचे उल्लंघन म्हणा किंवा निष्काळजीपणा म्हणा, पण याची शिक्षा आपल्या सर्वांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यास होते. आर्थिक तोटे होतात ते वेगळेच. अस्वच्छ आहार, अंमली पदार्थांचे व्यसन, अशुद्धता, आळस, आधुनिक जीवनशैली आपल्याला मारत आहे, पण आपण सुधारत नाही आहोत. ही जनजागृती प्रत्येकाची जबाबदारी आहे, आपण सर्वांनी अमूल्य जीवनाचे मूल्य समजून घेतले पाहिजे. जर आपण आताच जागे झालो तर आनंदी आणि निरोगी भारताची निर्मिती करून आरोग्य समस्यांवर दरवर्षी अब्जावधी डॉलर्सची बचत करू शकतो आणि वाढत्या गंभीर आजारांचा वेगही कमी करू शकतो.

**-डॉ. प्रितम गेडाम**

## निवडक

### मोरे महाविद्यालयात मार्गदर्शनपर व्याख्यान



**रोहे** : एम. बी. मोरे फाउंडेशनचे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त एनएसएस विभागातर्फे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर : एक उत्तम प्रशासक या विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. राष्ट्रीय संघ सेविका समिती, रोहा यांच्या प्रमुख अरुंधती पेंडसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. सेविका कीर्ती जोशी यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जीवनशैली, राजकीय नैपुण्य, सामाजिक योगदान तसेच त्यांची दूरदृष्टी याबाबत विद्यार्थिनींना माहिती दिली. या वेळी निशा थकते, चारुशीला लिमये, महाविद्यालय एनएसएस विभाग प्रमुख प्रा. मयुर पाखर, सहाय्यक प्रा. ममता बींद, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि ६६ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### माहिती अधिकार दिनानिमित्त निबंध स्पर्धा

**खालापूर, खोपोली** : शनिवारी खालापूर पोलीस ठाणेकडून सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक याठिकाणी आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला. या वेळी निबंध स्पर्धा तसेच चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सपोनि. मनिष मोरे व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे यशवंत सकपाल यांनी विद्यार्थ्यांना माहिती अधिकार दिनाचे महत्त्व व त्याचा त्यांचे जीवनात होणारे उपयोगांबाबत अवगत केले, तसेच हवालदार स्वप्नाली पवार यांनी महिला शिक्षिका, मुलींना पोलीस ठाण्याकडील पोलीस काका, पोलीस दीदी व डायल ११२, महिलांसाठी आपत्कालीन संपर्क क्रमांकाची माहिती दिली. कार्यक्रमास गोपनीय विभागाचे दिनेश भोईर, समीर पवार, सुरेश गावडे, कार्याध्यक्ष योगेंद्र शाह, मुख्याध्यापक बोंबले सर, कुंभार सर व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



# माथेरानमध्ये मुख्यमंत्री वयोश्री योजनेला उत्तम प्रतिसाद

**माथेरान : प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कार्यान्वित होत असताना ज्येष्ठ नागरिकांनासुद्धा आर्थिकसहाय्य म्हणून राज्य सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री वयोश्री योजनेस सुरुवात करण्यात आली आहे. त्यास ज्येष्ठांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.



माथेरान शहरतील मुख्य महात्मा गांधी रस्त्यावर असलेल्या श्रीराम मंदिराशेजारील डिवाईन कलेक्शन येथे भाजप, ज्येष्ठ नागरिक संस्था यांच्या वतीने येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मुख्यमंत्री वयोश्री योजनेत ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एकदाच ३००० रुपयांची आर्थिक मदत शासनाकडून मिळणार आहे. ही रक्कम आधार कार्डमार्फत त्यांच्या बँक खात्यात जमा होणार असून योजनेतून पात्र झालेल्या वृद्ध लाभार्थ्यांना येथे त्यांच्या शारीरिक दुर्बलतेनुसार या रकमेतून उपकरण साधणे खरेदी करता येतील.

योजनेचा लाभ घेण्यासाठी याठिकाणी जवळपास ५० लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे जमा करून उत्तम प्रतिसाद दिलेला आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी येथील भाजप कार्यकर्ते चंद्रकांत जाधव, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, अनंत शेलार, महिला कार्यकर्त्या सुहासिनी शिंदे, रजनी कदम, माथेरान ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अरविंद रांजाणे, प्रकाश कृष्णा सुतार यांनी प्रयत्न केले.

> **माथेरान शहरातील ज्येष्ठ नागरिकांना या सुवर्ण संधीचा लाभ घेता यावा म्हणून भाजप आणि ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने शहरातील ज्येष्ठ नागरिकांचे फॉर्म भरण्यात आले असून शिबिरासाठी उत्फूर्त प्रतिसाद दिला. या योजनेपासून कोणतेही ज्येष्ठ नागरिक वंचित राहू नये म्हणून शनिवार आणि रविवार वगळून सदरचे शिबिर सुरू ठेवण्यात येईल.**
> **–चंद्रकांत जाधव, भाजप कार्यकर्ते तथा माजी नगराध्यक्ष**

# रोहेकरांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न –खासदार तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

रोहेकरांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांची मागणी लक्षात घेता शहरातील मुरूड–रोहा–कोलाड मार्गावरील रस्त्यावर डिव्हायडर बसवण्यात येणार असल्याचे ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित बैठकीत ठरवण्यात आले.

बैठकीला माजी आमदार अनिकेत तटकरे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवळ, उपवन संरक्षक अप्पासाहेब निकात, तहसीलदार किशोर देशमुख, मुख्याधिकारी अजय एडके, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, लालताप्रसाद कुशवाह, राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस नंदकुमार म्हात्रे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, शहराध्यक्ष अमित उकडे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, अहमद दर्जी, राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, समिर सकपाळ, सुभाष राजे, नितीन पिंपळे, जितेंद्र पडवळ आदी उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी, महाराष्ट्रातील अत्याधुनिक नाट्यगृह रोहा शहरात उभे राहत आहे. रोहा रेल्वे स्टेशन सुसज्ज आधुनिक सुविधांनी तयार होत असून रेल्वे स्टेशनचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. रस्त्याला अडथळा येत असलेले विद्युत पोल हटवणे, गटारे बांधणे, अतिक्रमण काढणे, डिव्हायडर बसवणे, मधोमध विद्युत पोल बसवणे, पोलीस चौकी ते फिरोज टॉकीज रस्ता बनवणे, फेरीवाल्यांचा अतिक्रमण, सागर डेअरी समोरील मोरी बनवणे, रोहा रेल्वे स्टेशन सुशोभीकरण, रोहा रेल्वे स्टेशन येथे जलद गार्डन थांबा, रोहा निडीपर्यंत रस्त्यावरील खड्डे बुजवणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.



# पतसंस्थांनाही ठेवींवर विमा संरक्षण मिळावे -डॉ. उदय जोशी

**अलिबाग : प्रतिनिधी**

कपूर समितीच्या अहवालानुसार आर्थिक संस्थांच्या ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था हवी. बँकांप्रमाणे पतसंस्थानादेखील ठेवींवर विमा संरक्षण मिळाले पाहिजे, अशी मागणी सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी यांनी केली.



अलिबाग येथील आदर्श भवन येथे आयोजित जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघच्या २५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत डॉ. जोशी बोलत होते. या वेळी महासंघाचे अध्यक्ष ॲड.जे. टी.पाटील, सचिव योगेश मगर, राज्य फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, दिलीप पटेल, जगदीश कवळे, अमित ओझे, प्रमोद पाटील, चंद्रकांत घोसाळकर, प्रकाश चांदीवडे, गणेश म्हात्रे, संजय वानखेडे, उषा चांदगावकर आदी उपस्थित होते.

सचिव योगेश मगर यांनी, १०१ प्रकरणातील वसुलीसाठी यंत्रणा ही राबवित असल्याची माहिती देत पतसंस्था सदस्यांनी वर्गणी भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले. उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील यांनी, संभाजीनगर खंडपीठाकडे हा विषय न्यायप्रविष्ठ असून तुर्तास कोणत्याही पतसंस्थेने अंशदान भरू नये, असे स्पष्ट केले.

सभेच्या यशस्वीतेसाठी समता आंबेकर, विवेक पाटील व भुषण राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अवघड वळणावर ट्रक अडकल्याने सुपेगाव मार्ग बंद

**मुरूड : प्रतिनिधी**

रोहा येथे जलद पोहचण्यासाठी जवळच्या सुपेगाव मार्गावर एका अवघड वळणावर ट्रक बंद पडल्याने येथील वाहतूक बंद पडली आहे.



तळेखार मार्गावरून सुपेगावमार्गे मुरूड येथे हा ट्रक येत असतानाच सुरुवातीच्या पहिल्याच एका अवघड वळणावर तीन दिवसांपूर्वी हा ट्रक बंद पडला आहे. ट्रक रस्त्याच्या मधोमध असल्याने वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. त्यामुळे एसटी वाहतूक या मार्गावरील बंद करण्यात आली आहे. प्रवासी व विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. सर्व गाड्या भालगावमार्गे सोडण्यात येत आहेत. याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याला संपर्क साधला असता, हा भाग रोहा सार्वजनिक बांधकाम खात्याकडे आहे. याबाबत आम्ही त्यांना कळवू, असे सांगितले आहे, परंतु पुढे कोणतीही कार्यवाही न झाल्याने नाराजी पसरली आहे.

# कर्जतमध्ये नशेखोर टपरीवाल्याकडून मुलींची छेड; नागरिकांनी दिला चोप

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील श्रीराम पुलाच्या परिसरात नगर परिषदेच्या जागेत अनधिकृत टपरी लावण्यात आली आहे. या टपरीचालकाकडून शालेय मुलींची छेड काढण्यात आली. त्यामुळे संतप्त नागरिकांनी त्या टपरीचालकाला चोप दिला.



श्रीराम पुलावर असलेल्या अनधिकृत टपरीधारकाकडून बेकायदेशीर गुटख्यासह तंबाखु, विडी, सिगारेट यांची विक्री होत असून विक्रेता गांजासारखा अंमली पदार्थदेखील विक्री करत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले, तसेच हा परप्रांतीय विक्रेता व त्याचे परप्रांतीय साथीदार या टपरीमध्ये बसून मद्यपान करून शेजारीच असलेल्या बसस्टॉपमध्ये बसची वाट पाहत असलेल्या शालेय मुलींची छेडछाड काढत असतात. स्थानिकांनी व रिक्षाचालकांनी त्यांना अनेकदा समज दिली होती, तरीदेखील परप्रांतीय विक्रेता दारुच्या नशेत शालेय मुलींची छेड काढत होता. म्हणून स्थानिकांनी त्याला चोप दिला.

याबद्दल सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानंतर मुख्याधिकारी गारवे यांनीदेखील तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले आणि नगरपरिषदेचे अतिक्रमण विरोधी पथकाचे बाळा निकाळजे यांना सदर ठिकाणी असलेली अनधिकृत टपरी हटविण्यास पोहचले, परंतु टपरीधारक टपरी बंद करून पसार झाला.

# आमदार नितेश राणेंची मुरूड पोलीस ठाण्याला भेट

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरात गणपती विसर्जनावर झालेली दगडफेक झाली होती. या घटनेच्या पार्श्वभूमिवर शनिवारी (दि.२८) आपल्या समर्थकांसह आमदार नितेश राणे यांनी मुरूड पोलीस ठाण्यात अधिकारी वर्गाची भेट घेतली. या प्रकरणाचा जलद गतीने व योग्य तपास करण्याची मागणी त्यांनी केली.



आमदार नितेश राणे यांनी, मुरूड पोलिसांनी हिंदू समाजातील मुलांवर गुन्हे दाखल करताना पोलिसांची कॉलर पकडली असा उल्लेख केला आहे. आपण केलेले व्हिडीओ चित्रण दाखवा. खरंच पोलिसांची कॉलर पकडली असेल तर या सर्व तरुण मंडळीस मी पोलिसांसमोर हजर करतो. विनाकारण आमच्या मुलांवर केस दाखल करीत असाल तर मी स्वस्थ बसणार नाही. मुरूड पोलिसांच्या दिरंगाईमुळे मोर्चा पोलीस ठाण्यावर चालून आला आहे, जर त्यांनी वेळेतच कारवाई केली असती, तर पुढचा प्रकार टाळता आला असता. आमच्या हिंदू मुलांवर अन्याय मी कदापि सहन करणार नाही. पोलिसांनी दोन्ही समाजाला समान न्याय देण्याची भूमिका बजवावी, अशी मागणी केली.

# अलिबाग येथे हातमाग व यंत्रमाग कापड प्रदर्शनाला मुदतवाढ



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शहरातील सार्वजनिक वाचनालय, डोंगरे हॉल येथे सोलापूर येथील भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग व यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री केंद्राचे सुरू करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याने प्रदर्श २ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती प्रदर्शनाचे प्रमुख पांडुरंग पोतन यांनी दिली.

भारतीय संस्कृतीच्या प्रसारासाठी व हतमागाच्या विणकाम करून वापरण्यायोग्य कापड तयार केले जाते. या कापडाच्या वापरामुळे कोणत्याही प्रकारचा त्वचा रोग होत नाही. या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या हातमाग व यंत्रमागवर उत्पादित वस्त्रे जसे कॉटन साडी, इरकल साडी, मदुराई साडी, खादी साडी, धारवाड साडी, मदुराई सिल्क साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क साडी, प्रिंटेड ड्रेस, वर्क ड्रेस मटेरियल, पटोला ड्रेस, कॉटन परकर, टॉप पिस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, सतरंजी, पंचा, टॉवेल, वूलनचादर, दिवाणसेट, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर, लुंगी, शर्ट, कुर्ता विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे.

सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २० टक्के सुट ठेवण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खालापूर येथे लोकअदालतीत थकबाकी वसुली

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समिती आणि खालापूर न्यायालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आली. त्यात अनेक प्रकरणातील थकबाकी वसुली करण्यात आली आहे.

अनेक ग्रामपंचायत खातेदारांपैकी काहीजण आपली घरपट्टी व पाणीपट्टी भरणा वेळेवर करीत नाहीत, तर अनेकजण वर्षानुवर्ष थकबाकी यादीत समाविष्ट आहेत. सन्मानजनक तडजोड करावी यासाठी कार्यक्रम राबविण्यात आला. यात १२६४ जणांना घरपट्टी थकीत तर ३२५ जणांना पाणीपट्टी वसुलीसाठी नोटीस बजावण्यात आल्या होत्या. यात तडजोड अंती ४५८ घरपट्टी थकीतदार यांनी १,६४,१८,७३३ तर २१४ पाणीपट्टी धारकांनी २७,७०७९६ रूपयांचा भरणा केला. एकूण १,९१,८९,५२९ थकीत वसुली व ६७२ प्रकरणे निकाली झाल्याची माहिती ग्रामविस्तार अधिकारी पंचायत समिती खालापूर शैलेंद्र तांडेल यांनी दिली.


## माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

**माथेरान, ता. कर्जत, जिल्हा रायगड. ४१०१०२, ई–मेल आयडी: mcomatheran@gmail.com**
**Website - www.matheranmahaulb.maharashtra.gov.in**

**जावक क्र. : मागिनप/००१८/२०२४–२५** **दिनांक : २७/०९/२०२४**

### निविदा सूचना

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, जि. रायगड हे १) माथेरान गिरीस्थान नगरपरिषद हद्दीमध्ये विविध ठिकाणी ई–शौचालये बसविणे. २) माथेरान गिरीस्थान नगरपरिषद हद्दीमध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेकरिता कम्पोस्टिंग मशिन (Automatic Fully Mechanized Organic Waste Machine for Compost) खरेदी करणे. या कामाचे GEM PORTAL द्वारा निविदा मागविण्यात येत आहेत. सदर संपुर्ण निविदा प्रक्रीया GEM PORTAL निविदाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीद्वारे होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धिपत्रक इत्यादीची माहिती GEM PORTAL संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**



## जाहीर नोटीस

**उरण येथील मे. दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) (मा. सय्यद साहेब) यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज क्र. २६४/२०२४
ने.ता. २८/११/२०२४
नि. ०७/ड

श्रीमती हिराबाई बाळाराम घरत व वगैरे .........अर्जदार
वि
कोणीही नाही ................सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार यांनी उरण येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचेकडे कै. बाळाराम जोमा घरत यांचा वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. कै. बाळाराम जोमा घरत यांचा मृत्यू दि. २२/०६/२०२४ रोजी अंबिकावाडी नागाव ता. उरण जि. रायगड येथे मृत्यू झालेला आहे.

कै. बाळाराम जोमा घरत यांच्या स्वमालकीच्या अनु. क्र. १ ते ४ व सहमालकीच्या अनु. क्र. ५ मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शेवा, ता. उरण जि. रायगड.**

| अनु क्र | गांव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे आर–प्रति |
|---|---|---|---|---|---|
| १. | शेवा | १२० अ | ३५ | ६ | ०–०७–० |
| २. | शेवा | १२० ब | १८ | ५ | ० – १०– ० |
| ३ | शेवा | १२० क | ६ | ९ | ०– ३६–० |
| | | | २१ | २ | ०–०३–५ |
| | | | २५ | २ | ०–०६–४ |
| | | | ४६ | ९ | ०–०५–० |
| | | | ४७ | १३ | ०–१९–० |
| | | | ४८ | १३ | ०–०२–० |
| | | | ४८ | १५ | ०–०५–१२ |
| | | | ५० | १ | ०–०६–८ |
| | | | ५० | ११ | ०–२१–१२ |
| | | | १२८ | २०+२१ | ०–१४–० |
| | | | १३१ | २० | ०–०४–४ |
| | | | १३२ | ५ | ०–११–१२ |
| | | | १३२ | ६ | ०–०१–१२ |
| | | | १३२ | १४ | ०–०१–० |
| ४ | शेवा | ४ | गोठा | | १०५ चौ.मी |
| ५ | शेवा | १८९ | ४३ | २१ | ०– ६–० |

सदर मिळणाऱ्या भूखंडामध्ये कै. बाळाराम जोमा घरत यांचा मृत्यू झाल्यानंतर कै. बाळाराम जोमा घरत यांचे नाव कमी करुन सदर भूखंडावर त्यांचे वारस १) श्रीमती हिराबाई बाळाराम घरत २) श्री. रत्नाकर बाळाराम घरत ३) श्री. रमेश बाळाराम घरत ४) श्री. राजेंद्र बाळाराम घरत वारसांची नावे त्यांच्या जागी सिडको दप्तरी रेकॉर्डवर येणे गरजेचे झालेले आहे. त्याकामी दिवाणी न्यायालयाकडून वारसदाखल्याचा निवाडा जाहीर करुन घेणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सबब सदर कारणाकरीता अर्जदार यांनी मे. दिवाणी न्यायालयात वारसदाखला मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसाहक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत आपल्या हरकती या न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून वारस दाखला देण्यात येईल. मागाहुन आलेल्या कोणत्याही हरकतीची विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २४ माहे ०९/ २०२४ आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/** कनिष्ठ लिपीक, दि. न्या. क. स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — **सही/–** सहा. अधिक्षक, दि. न्या. क. स्तर, उरण

## निवडक

### दुर्गम भागामध्ये आरोग्य तपासणी

**मोहोपाडा :** दुर्गम आणि डोंगराळ भागात राहत असलेले ग्रामस्थ आजारी पडल्यास आजही शेकडो मिटर पायी चालत जावे लागते. यासाठी एटीजी हेल्थ केअर



सामाजिक संस्थेतर्फे पुढाकार घेत त्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. साकुचीवाडी या गावामध्ये जाऊन ही आरोग्य तपासणी करण्यात आली. या वेळी मोफत औषधेही देण्यात आली. या उपक्रमास बिलियन हार्ट बिटींग (अपोलो हॉस्पिटल) यांचे सहकार्य लाभत आहे. लहानांपासून ते वयोवृद्धांची आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉ. विश्वासराव गिरी, अश्विनी गिरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. या वेळी परेश सर, राठोड सर, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण शिद, रोहित पाटील आदी उपस्थित होते.

### चिरनेरमध्ये रंगला खेळ पैठणीचा

**उरण :** चिरनेर येथील श्रीराम सांस्कृतिक कला, क्रीडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे महिलांसाठी विविध



स्पर्धांचे आयोजन केले होते. या निकिता नारंगीकर यांनी भाऊजींची भूमिका बजावणाऱ्या आनंद नारंगीकर यांनी विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देत सर्वच खेळात बाजी मारली, तर अनिता नारंगीकर या उपविजेत्या ठरल्या. खेळामध्ये चार फेऱ्यांमध्ये पोहचणाऱ्या वहिनींनाही आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.

### 'करंजाडेत निर्भया पथक सुरू करावे'

**पनवेल :** करंजाडे वसाहत परिसर मोठ्या प्रमाणात वाढत असून रात्रीच्या वेळी महिला वर्ग उपनगरातून कामावरून येत असतात. अशा महिलांसाठी पनवेल शहर पोलिसांनी तसेच करंजाडे पोलीस चौकीमार्फत रात्रीच्या त्रत्रवेळी विशेष निर्भया पथक सुरू करण्याची मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे. या वेळी मागणीचे निवेदन मनसेचे करंजाडे शहराध्यक्ष सिद्धेश पावले, उपाध्यक्ष प्रतिक जाधव, मनसैनिक गणेश चौधरी, प्रवीण जगदाळे, अय्यप्पा नंबियार यांनी दिले. या निवेदनात त्यांनी करंजाडे वसाहतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांची गस्त वाढवावी, तसेच रात्रीच्या वेळी विशेष करून महिलांसाठी निर्भया पथक सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

# सिडकोत लवकरच जनता दरबार

## नवनिर्वाचित अध्यक्ष संजय शिरसाट यांची घोषणा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय शिरसाट ॲक्शन मोडवर आल्याचे पहायला मिळत आहे. एक दिवसाआड सिडको भवनात येऊन शिरसाट नागरिकांच्या तक्रारी ऐकत आहेत. मी फक्त अर्ज स्वीकारण्यासाठी अध्यक्ष झालेलो नाही, असे सांगत शिरसाट यांनी लवकरच सिडको भवनात जनता दरबार भरवून नागरिकांच्या तक्रारी आणि निवेदनांवर सिडको प्रशासनाकडून कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

चार वर्षांपासून सिडकोचे अध्यक्षपद रिक्त होते. सिडकोच्या अध्यक्षपदावर नुकतीच आमदार संजय शिरसाट यांची वर्णी लागून ठाणे व रायगड जिल्ह्यांपेक्षा मराठवाड्याला ही संधी दिली.



सिडकोचा पदभार घेतल्यावर शिरसाट यांनी पहिल्याच दिवशी, मी निष्ठावंत शिवसैनिक असल्याचे सांगत अध्यक्षपदावर काम करताना नवी मुंबईकरांच्या समस्या सोडविणारा अध्यक्ष होईन, अशी घोषणा केली.

पहिल्या दिवशीच अध्यक्ष शिरसाट यांनी सिडकोची संचालक मंडळाची बैठक मुंबईला निर्मल भवन येथे घेण्याची परंपरा मोडीत काढून ही बैठक बेलापूर येथील सिडको भवनात घेतली. या बैठकीत ऐरोली येथील ३० हेक्टर जमीन विकासकाला देण्यासंदर्भातील वादग्रस्त विषयाला स्थगिती देऊन सुटसुटीत आणि सिडको मंडळाचा या प्रकल्पामुळे काय लाभ होईल याचे पुनर्सादरीकरण करण्याची टिप्पणी नोंदवत संबंधित प्रस्ताव पुढील बैठकीत मांडण्याची सूचना केली.

> **एखाद्या नागरिक किंवा नागरिकांच्या समुहाने निवेदन दिल्यास त्यावर सिडकोकडून केलेल्या कार्यवाहीचे उत्तर जनता दरबारात दिले जाईल. काही प्रश्नांसाठी सिडको संचालक मंडळातही त्या विषयांवर निर्णय घेता येतील. नागरिक त्यांचे निवेदन सिडको अध्यक्ष जनता दरबार या मथळ्याखाली सिडको भवनात देऊ शकतील. मी त्यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.**
>
> **-संजय शिरसाट, अध्यक्ष, सिडको**



### द्रोणागिरी हायस्कूल येथे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे करंजा येथील द्रोणागिरी हायस्कूलमध्ये शुक्रवारी (दि.२७) रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७व्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आला.

या वेळी करंजा मच्छिमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, आयएव्हिएल नवघर टर्मिनलचे तरंग जैन, नाझनिन शेख, कविता शेट्टी, प्रफुल्ल म्हात्रे, संदीप काळे, लहास प्रतिष्ठानचे ट्रस्टी ज्ञानेश्वर भोईर, प्रतीक्षा फर्डे, प्रमुख वक्ते अतुल पाटील, ज्युनियर कॉलेज जासईच्या मुख्याध्यापिका सुरेखा म्हात्रे आदी उपस्थित होते. या वेळी आयएव्हिएल यांच्या सीएसआर फंडातून विद्यालयातील २१० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

कार्यक्रमात एसएससीच्या तीन विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. प्रमुख वक्ते अतुल पाटील यांनी कर्मवीर अण्णा यांच्या जीवनाविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यक्षीय भाषणामध्ये प्रदीप नाखवा यांनीही कर्मवीर जीवनाविषयी माहिती सांगितली.

## खासदार सुनील तटकरे यांचा उरण राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे सत्कार



**उरण : बातमीदार**

आर्थिक विकासात मोठा वाटा असलेल्या देशाच्या संसदीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू समितीच्या अध्यक्षपदी खासदार सुनील तटकरे यांची निवड झाल्याबद्दल उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे सत्कार करण्यात आला.

उरण तालुक्याचे अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी खासदार सुनील तटकरे यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, राष्ट्रवादीचे उरण विधानसभा अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर, तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर, तालुका युवा अध्यक्ष समत भोंगले, तालुका सरचिटणीस दिनेश पाटील, तालुका उपाध्यक्ष युवक काँग्रेस अमित साहू, स्वप्नील कुंभार, दीपराज ठाकूर, भूषण ठाकूर आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल खासदार सुनील तटकरे यांचे देशभरातून अभिनंदन होत आहे. ही विशेषतः रायगडसाठी अभिमानाची बाब आहे. सर्वसामान्यांचे आदर्श नेतृत्व म्हणून जनता, खासदार तटकरे यांच्याकडे बघते. त्यांच्या या निवडीमुळे कोकणला खरा न्याय मिळाला आहे, असे मत उरण तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी व्यक्त केले.

## नवरात्रोत्सव मंडळांना अधिकृत वीजजोडणी घेण्याचे आवाहन

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**कल्याण, भांडुप : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांनी सवलतीच्या दराने तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध असलेली अधिकृत वीजजोडणी घ्यावी, तसेच उत्सव मंडळांनी उत्सवातील देखावे, मंडप, रोषणाई व वीज सुरक्षेतील त्रुटीमुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी गांभीर्यपूर्वक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणकडून नवरात्रोत्सव मंडळांना घरगुती वीज ग्राहकांच्या दराने वीजपुरवठा देण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे.

पदाधिकाऱ्यांनी संबंधित क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचाऱ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत, तसेच तक्रारींसाठी किंवा तातडीच्या मदतीची गरज भासल्यास २४ तास उपलब्ध असलेल्या (१८००२१२३४३५) किंवा (१८००२३३३४३५) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.



## न्हावे विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, फळांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी यांचे वडील कै. अनंत जोमा कोळी यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि फळांचे वाटप करण्यात आले.

स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर यांच्या अध्यक्षतेखाली हा उपक्रम झाला. या कार्यक्रमाप्रसंगी न्हावे गावचे सरपंच विजेंद्र पाटील,माजी सरपंच व स्कूल कमिटी सदस्य हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच राजेश म्हात्रे, ग्राम सुधारक मंडळाचे अध्यक्ष गजानन म्हात्रे, वनिता महिला मंडळाच्या अध्यक्षा मीनाक्षी पाटील, किशोर कोळी, ग्रामपंचायत सदस्य रंजना पाटील, अनिषा पाटील, सुनिता भोईर तसेच जागृती म्हात्रे, कोमल ठाकूर, नरेश मोकल, कामिनी कोळी, उषा देशमुख, चंद्रकांत पाटील, संदीप पाटील, ज्ञानेश्वर कोळी व ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी यांनी केले तर ज्येष्ठ शिक्षिका कुसुम ठोंबरे यांनी आभार मानले.

## खारघर वसाहतीमधील खड्डे बुजविण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील शीघ्र कृती दलसमोरील सिग्नलजवळ असलेल्या धोकादायक खड्ड्यांमुळे अडथळा होत आहे. त्यामुळे धोकादायक खड्डे बुजवून वाहतूक कोंडीची समस्या दूर करावी, अशी मागणी तळोजामधील नागरिकांकडून केली जात आहे.

पनवेल-शिळफाटा मार्गावर नेहमी वाहनांची वर्दळ असते. तळोजा वसाहतीत प्रवेश करताना आणि बाहेर पडताना चारही बाजूला वाहतूक कोंडी होत असल्यामुळे तळोजा वाहतूक पोलिसांनी शीघ्र कृती दल समोरील चौकात सिग्नल यंत्रणा कार्यान्वित केली आहे. दरम्यान, तळोजा वसाहतीमधून बाहेर पडताना पनवेल, मुंब्रा आणि खारघर तसेच शिळफाटाकडे जाताना सिग्नल यंत्रणा लगत असलेल्या रस्त्याची दूरवस्था झाली असून, रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यात वाहने अडकण्याची भीती असल्यामुळे मोठी कसरत करावी लागत आहे.

पनवेल महापालिकेने अपघात टाळण्यासाठी रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी रहिवाशी करीत आहेत.





## बॉयलर इंडियाच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागांतर्गत असलेल्या बाष्पके संचालनालयाच्या वतीने आयोजित जागतिक स्तरावरील बॉयरल इंडिया २०२४ प्रदर्शन, चर्चासत्र व कार्यशाळेला विद्यार्थी आणि उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रदर्शनात इटली, युके, जर्मनी, चीन, स्वीडन, बेल्जीयम, नेदरलँड या देशासह सुमारे २६० उद्योजकांनी सहभाग नोंदविला आहे. बाष्पके (बॉयलर) संबंधित विविध यंत्रे, साहित्य यांची मांडणी येथे करण्यात आली होती. तीन दिवसीय प्रदर्शनादरम्यान शुक्रवारी (दि.२७) झालेल्या सेमीनारमध्ये जवळपास ५०० अभ्यागंतानी भेट दिली, तसेच दिपक फर्टिलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल लि. तळोजा, थायसनब ग्रूप इंडास्ट्रिज प्रा.लि.पुणे, राष्ट्रीय केमिकल्स न्ड फर्टिलायझर्स लि.चेंबूर, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. माहूल, फोबर्स मार्शल प्रा.लि. पुणे, टीकेआयएल इंडिस्ट्रियल प्रा.लि.आदींचा सहभाग होता. त्याचप्रमाणे एमएच साबो सिद्धिविनायक कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मुंबई, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकल ठाणे, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकल कोल्हापूर, राजाराम बापू कॉलेज ऑफ शुगर टेक्नालॉजी इस्लामपूर, जि.सांगली, एम. सरोदे इंजिनिअरींग कॉलेज बीड यांनी या प्रदर्शन चर्चासत्रात सहभाग नोंदविला.

या प्रदर्शनातून कामगार सुरक्षेला प्रोत्साहन देत बाष्पकांच्या सुरक्षित व कार्यक्षम वापर कसा करावा हे सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करण्यात आले.



## हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या स्मृतिदिनानिमित विविध कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

चिरनेर हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून बिरसा ब्रिगेड आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते हुतात्मा नाग्या महादू कातकरी स्मारक चिरनेर अशा बाईक रॅलीसह विविध कार्यक्रमाचे आयोजन करून हुतात्म्यांना अभिवादन केले.

या वेळी मानवी हक्क आयोगाचे सचिव नितीन पाटील, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, बिरासा ब्रिगेड रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील वाघमारे, बिरसा ब्रिगेड पेण तालुका अध्यक्ष जितेंद्र वाघमारे, अंकुश वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवरांनी हुतात्मा स्मारकास अभिवादन केले.

## सीकेटी विद्यालयात शार्क टँक स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाने शुक्रवारी (दि.२७) शार्क टँक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

शालेय वयापासून विद्यार्थ्यांना उद्योगांबाबत अधिक सुजाण करण्याचे लक्ष ठेवून ही स्पर्धा विद्यालयात घेण्यात आली. स्पर्धेच्या मुल्यांकनासाठी आयडीबीआय बँकेतील एजीएम जितू कुमार व मुख्याध्यापक संतोष चव्हाण निरीक्षक म्हणून लाभले होते. लाल, हिरवा, निळा व पिवळा या चारही कुलानुसार इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. लाल हाऊस प्रोटीन बार, पिवळा हाऊस ॲलगी पेपर, निळा हाऊस क्लीनर, हिरवा हाऊस एअर प्युरिफायर या प्रॉडक्ट अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपले उत्कृट असे सादरीकरण करीत आपल्या व्यवसायामध्ये त्यांनी गुंतवणूक का करावी, हे पटवून दिले. आयडीबीआयचे अधिकारी जितु कुमार यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

स्पर्धेमध्ये कुल लालने प्रथम क्रमांक पटकावला. कुलातील विद्यार्थी ऋतुजा म्हात्रे, सोहम ठाकूर, तनिका राना, रिचा लोंढे, हिरव्या कुलातील विद्यार्थी ऋत्विक पाटील, वैष्णव आहेर, ईश्वरी खाडे, अभिषेक घरत या सर्व स्पर्धकांचे शिक्षक, सुपरवायजर मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी भरभरून कौतुक केले.

## नवनियुक्त तलाठ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात जिल्हाभरातून नवीन सजेवर नियुक्त झालेल्या नवनियुक्त तलाठ्यांची प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.



यामध्ये महसूली ऑनलाईन कामकाज पद्धत, ई-पिक पाहणी, ई-चावडी, आपत्ती व्यवस्थापन, सं.गा.यो, निवडणूक, पुरवठा तसेच राजशिष्टाचार या विषयावर चर्चा करण्यात आलेली तलाठी कामकाज करताना क्षेत्रीय स्तरावरील कामकाजाचे नियोजन, विभागातील वेगवेळया योजनेवर साधक बांधक चर्चा करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे तलाठी यांची आर्थिक साक्षरता च्या माध्यमातुन बचतसाठी प्रयत्न केले पाहिजे यांचे महत्त्व विषद करण्यात आले. कार्यशाळेस निवासी नायब तहसिलदार संभाजी शेलार, मंडळ अधिकारी शशिकांत सानप, सानिका पाटील व आरती रेवसकर यांनी कार्यशाळेस मार्गदर्शन केले.

# कर्जतमध्ये हातगाड्यांवरील कारवाई थांबली



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहर बचाव समितीने नागरी समस्यांबाबत आवाज उठवला आहे. समितीच्या आक्रमक भूमिकेनंतर नगर परिषदेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने शहरात रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या हातगाड्या उचलण्यास सुरुवात केली, मात्र ही कारवाई व्यापारी फेडरेशनकडून थांबवण्यात आली आहे. व्यापाऱ्यांना टार्गेट करू नये. सर्वांना विश्वासात घेऊन कारवाई करावी तसेच बाजारपेठेच्या बाहेर पार्किंगची व्यवस्था केल्यास हा प्रश्न सुटेल, असे फेडरेशनचे अध्यक्ष मयूर जोशी यांचे म्हणणे आहे.

कर्जत शहरातील २६ प्रश्नांवर कर्जत शहर बचाव समितीकडून निवेदन देण्यात आले आहेत. त्यात बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्याही नमूद करण्यात आली होती. त्यामुळे नगर परिषदेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने शहरातील हातगाड्या उचलण्याची कारवाई सुरू केली, पण मुख्य बाजारात ही कारवाई सुरू असताना व्यापारी संकटात आले होते. म्हणून कर्जत दहिवली व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष मयूर जोशी यांनी पालिकेच्या पथकाला कारवाई थांबवण्याची सूचना केली. त्यानंतर पालिकेच्या वतीने कारवाई करण्यासाठी आलेल्या पथकाला परतावे लागले.

**आम्ही नगर परिषद प्रशासनाने बेकायदा हातगाड्या व टपऱ्या काढण्याची कारवाई सुरू केली. सहा हातगाड्या जप्त केल्या. ज्या अधिकृत हातगाड्यांची थकबाकी होती त्यांची वसुली केली, पण व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष मयूर जोशी यांनी कारवाई करू नये, असे सांगितले. त्यामुळे कारवाई थांबवण्यात आली. मुख्याधिकारी यावर पुढील निर्णय घेतील.**

**–रवींद्र लाड**, कार्यालयीन अधीक्षक

**आम्ही कर्जत शहर बचाव समितीच्या माध्यमातून मुख्य २६ मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये हीसद्धा मागणी आहे. कारवाई थांबवली असली तरी तो नगर परिषदेचा भाग आहे. आमची मागणी कायम आहे. तिची अंमलबजावणी करण्याचे काम नगरपरिषदेचे आहे.**

**–ॲड. कैलास मोरे**,कर्जत बचाव समिती

**कर्जत शहरातील वाहतूक कोंडी केवळ व्यापारी किंवा हातगाडीवाल्यांमुळेच होत नाही. अनधिकृत रिक्षा स्टँड, नागरिकांची अस्ताव्यस्त वाहने लावण्याची सवय आदी कारणे आहेत. त्यांच्यावरही नियमाने कारवाई केली पाहिजे तसेच बाजारपेठेच्या बाहेर पार्किंगची व्यवस्था केल्यास हा प्रश्न सुटेल.**

**–मयूर जोशी**, अध्यक्ष, कर्जत–दहीवली व्यापारी फेडरेशन

# खालापूरमध्ये परतीच्या पावसात घर पडले

## कुटुंब नातेवाईकांकडे वास्तव्यास गेल्याने बचावले

**चौक : प्रतिनिधी**

दैव बलवत्तर म्हणून आणि आपल्या मनाने कौल दिल्याने राहते घर सोडून दुसऱ्या घरी राहावयास गेल्याने परतीच्या पावसात घर पडूनही जीवितहानी झाली नाही.

सध्या परतीचा पाऊस तुफान पडत असून जनजीवन विस्कळीत होत आहे. हवामान खात्यानेदेखील रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट घोषित केला होता. खालापूर तालुक्यातील धारणी आदिवासीवाडी येथील किशोर गणपत पवार यांचे कुडामेडीचे घर जोरदार पावसात पूर्णतः पडले.




त्याआधीच त्यांनी यात आपले घर पडलेच तर काय होईल? अशी त्यांनी कल्पना केली आणि पत्नी व मुलगा यांना घेऊन आपले घर सोडून जवळच नातेवाईक यांच्या घरी राहण्यास गेले होते. त्यामुळे ते बचावले.

तलाठी देशमुख यांनी घटनास्थळाला भेट दिली, सर्व माहिती घेऊन पंचनामा केला व मदतीसाठी सर्व कागदपत्रांची तपासणी करून अहवाल खालापूर तहसीलदार यांना सादर केला.

# खासदार सुनील तटकरे पेट्रोलियम व नॅचरल गॅस पार्लमेंटरी कमिटी चेअरमनपदी

**मुरूड, म्हसळा : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांची केंद्रीय पेट्रोलियम व नॅचरल गॅसच्या पार्लमेंटरी कमिटीच्या चेअरमनपदी निवड जाहीर करण्यात आली आहे.



खासदार तटकरे हे राष्ट्रवादीचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक असून सध्या ते पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. राष्ट्रवादीमध्ये प्रथमच केंद्रीय पेट्रोलियम व नॅचरल गॅसच्या पार्लमेंटरी कमिटीचे चेअरमन पद प्राप्त झाले आहे. या समितीमध्ये एकूण ३१ सदस्य असतात. यापैकी २१ लोकसभा आणि १० राज्यसभेचे सदस्य असतात. पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस संबंधित एखादा विषय सभागृहात चर्चेला येणार असेल तर ही समिती त्या विषयाची तपासणी करून त्याचा अहवाल सभागृहाला सुपूर्द करते. या महत्त्वाच्या अशा समितीच्या चेअरमनपदी खासदार तटकरे यांची नियुक्ती झाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे.

# खासदार श्रीरंग बारणे केंद्रीय ऊर्जा विभाग स्थायी समिती अध्यक्षपदी

**चौक : प्रतिनिधी**

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्रीय ऊर्जा विभागाच्या स्थायी समिती अध्यक्षपदी निवड झाली असून केंद्रीय राजभाषा समितीच्या संयोजकपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे.

खासदार श्रीरंग बारणे हे तिसऱ्यांदा लोकसभेवर निवडून गेले आहेत. गेल्या दहा वर्षांत त्यांना केंद्र शासनाच्या विविध समित्यांवर काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. या वेळीही दोन महत्त्वाच्या पदांवर बारणे यांची नियुक्ती झाली आहे. लोकसभेची ऊर्जा विभागाची स्थायी समिती विद्युत मंत्रालय आणि नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या अनुदानसंबंधी मागण्यांवर विचार करते. विद्युत मंत्रालय आणि नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय यांच्यात प्रशासकीय नियंत्रण ठेवून सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि संस्थांवर या समितीकडून निगराणी ठेवणे हे या समितीचे मुख्य कार्य आहे. विद्युत विषयक विधेयक संसदेत सादर केल्यानंतर ते विधेयक या समितीकडे विचार विनिमयासाठी पाठवले जाते. त्यावर विचार करून योग्य सूचना ही समिती करते. संसदेने पाठवलेल्या विधेयकांवर ही समिती सूक्ष्मपणे चौकशी करते आणि जनतेकडून त्याबाबत सूचना मागवते.



दुसऱ्या संसदीय राजभाषा समितीचे अध्यक्ष केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आहेत. या समितीचे काम देशभर हिंदी भाषा व राज्यावर स्थानिक भाषा यांचा प्रसार करणे आहे. या समितीच्या संयोजकपदी खासदार बारणे यांची नियुक्ती झाली आहे. या दोन संधी मिळाल्याने त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १ व २ ऑक्टोबर रोजी स्वच्छता ही सेवा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यानुसार १ ऑक्टोबर रोजी स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून २ ऑक्टोबर हा स्वच्छ दिवस साजरा करण्यात येईल.

१ ऑक्टोबरला देशभर श्रमदान मोहीम राबविण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्ह्यात ग्रामपंचायत हद्दीत सामुहिक श्रमदानातून स्वच्छता करणे तसेच नागरिकांना सामुहिक स्वच्छता प्रतिज्ञा देण्यात येणार आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी परिसर स्वच्छताविषयक स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल.

२ ऑक्टोबर रोजी लोकसहभागातून स्वच्छ दिवस साजरा करण्यात येईल. स्वच्छता ही सेवा अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था, कंपन्या, व्यक्ती तसेच सफाई मित्रांचा सत्कार करण्याचे नियोजन आहे तसेच ग्रामसभेत ओडीएफ प्लस मॉडेल व्हिलेजाचा ठराव घेण्यात येईल. स्वच्छ माझे अंगण अभियानातील निकषपात्र कुटुंबांचा सरपंच, ग्रामसेवकांचे स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात येणार असून सार्वजनिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यांचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

या मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड आणि पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले आहे.

# सुदर्शन सीएसआर फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना आवाहन

**रोहे : प्रतिनिधी**

सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीच्या सुदर्शन सीएसआर फाउंडेशनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सुधा सितारा शिष्यवृत्ती योजनेस सुरुवात झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४–२५साठी असलेल्या या योजनेत अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज त्वरित सादर करावेत, असे आवाहन सुदर्शन सीएसआर फाऊंडेशन विभागाकडून करण्यात आले आहे.

सुधा शिष्यवृत्ती योजनेत रायगड जिल्ह्यातील गुणवंत आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी लाभ घेऊ शकतील. यंदापासून विद्यार्थिनींसह विद्यार्थ्यांना व दिव्यांगांनाही विशेष सुधा सितारा शिष्यवृत्ती दिली जाणार असून एकूण पात्र विद्यार्थ्यांपैकी २०० मुली, २५ मुले व २५ दिव्यांग विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाईल. यातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळते.

या शिष्यवृत्तीसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा तीन लाख), दहावीच्या परीक्षेत ८०% व अधिक गुणांनी उत्तीर्ण असावे, अकरावी ते पदवी द्वितीय वर्ष परीक्षा उत्तीर्ण, विद्यार्थी रायगड जिल्ह्यातील रहिवासी असावा, असे निकष आहेत.

या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड, बँक खाते तपशील, उत्पन्न प्रमाणपत्र, शाळा–महाविद्यालय प्रमाणपत्र, प्रवेश शुल्क पावती इ. आहेत. सुदर्शन सीएसआर फाउंडेशन लिंकद्वारे ऑनलाइन अर्ज करावा. सरकारी कर्मचारी व सुदर्शन कंपनीतील पर्मनंट कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती लागू असणार नाही.अर्ज करण्यासाठी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLScwDcšNtcOvpTx4B8kQiPGg6lGlwCU8šIObcMMYXP95QiW5Tw/viewform?pli=1 या लिंकचा वापर करावा अधिक माहितीसाठी अमर चांदणे (९५४५९३०८८९) किंवा दिशांत ढाणे (९९७५०७३४२२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# टीएमसी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद

**माणगाव : प्रतिनिधी**


येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलजमध्ये गुरुवारी (दि.२६) राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा आयोजित विद्यार्थी संवाद उपक्रम घेण्यात आला. या वेळी ९० विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी मोबाईलचा वापर चांगल्या पुस्तकांच्या पुस्तकांच्या वाचनासाठी करावा, असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य हर्षल जोशी यांनी करिअर कट्टाच्या उपक्रमांबद्दल माहिती दिली. प्रा. अशोक मोरे यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व उद्योजक आपल्या भेटीला तसेच छोटे छोटे कोर्सेस या उपक्रमांतर्गत सुरू असून त्याचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाला रायगड जिल्हा समन्वयक डॉ. बबन शिनगारे, डॉ. शिगवण, डॉ. नितीन मुटकुळे, अमित बाकाडे, शिक्षक उपस्थित होते.



# रोह्यातील मेहेंदळे हायस्कूलमध्ये रेखाकला परीक्षेला प्रतिसाद



**नागोठणे : बातमीदार**

राज्य शासनाच्या कला संचालनालयमार्फत सालाबादप्रमाणे घेण्यात येणाऱ्या शासकीय रेखाकला म्हणजेच एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा रोहा तालुक्यातील मेहेंदळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या केंद्रावर २५ ते २८ ऑक्टोबरदरम्यान यशस्वीपणे घेण्यात आली.

दरम्यान, संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी घेण्यात आलेल्या या परीक्षेच्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट या विषयांतर्गत विद्यार्थ्यांनी वस्तूचित्र, स्मरणचित्र, संकल्पचित्र व कर्तव्य भूमिती आणि अक्षरलेखन यावर विषयावर आधारित चित्र रेखाटली. या परीक्षेसाठी रोहा विभागातील विविध माध्यमांच्या शाळांमधील इयत्ता सातवी ते बारावीपर्यंतचे एकूण १०७१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

परीक्षेचे केंद्र संचालक मेहेंदळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य रमेश मोसे, तर परीक्षा प्रमुख येथील कलाशिक्षक सुनील दाभाडे यांनी काम पाहिले तसेच परीक्षा यशस्वीपणे करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

# महाडच्या रायगड कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये एम फार्म अभ्यासक्रम

**महाड : प्रतिनिधी**

नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित रायगड कॉलेज ऑफ फार्मसी मोहोप्रे, महाडला २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात दोन विषयांमध्ये मास्टर ऑफ फार्मसी या अभ्यासक्रमाला फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाकडून मान्यता मिळाली आहे.

फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेमुळे महाडमध्ये फार्मसी शिक्षणाच्या कक्षा रुंदावल्या असून एक महत्त्वपूर्ण टप्पा महाविद्यालयाने गाठला आहे. या कोर्स अंतर्गत एमफार्म (फार्मास्युटिक्स) आणि एमफार्म (फार्मास्युटिकल क्वालिटी ऍशुरन्स) या विषयांच्या प्रत्येकी १५ जागांचा समावेश आहे. फार्मास्युटिक्समध्ये औषधांचा विकास, उत्पादन व वितरणबाबत शिक्षण दिले जाईल, तर क्वालिटी एशुरन्समध्ये औषधांची



गुणवत्ता व सुरक्षेची खात्री कशी करावी याचा सखोल अभ्यास असणार आहे. या मान्यतेमुळे धन व गुणवत्ता नियंत्रण यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रामध्ये कौशल्य विकासाच्या संधी मिळणार आहेत. या कोर्सच्या उपलब्धतेमुळे महाड पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रात व्यावसायिक करियरची वाढीव उंची गाठता येईल, असे मत रायगड कॉलेज ऑफ फार्मसीचे समन्वयक प्रा. अमोल तांगडे यांनी व्यक्त केले.

फार्मसी कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने नियमित अभ्यासाबरोबरच वर्षभर विविध अभिनव कौशल्य विकासाचे उपक्रम राबविण्यात आले आहेत. या उपक्रमांचा चांगला परिणाम विद्यार्थ्यांच्या कौशल्यावर झाला आहे. मुलांच्या व्यक्तिमत्वात चांगला बदल घडून आलेला आहे. या सर्व बाबींमुळेच नामांकित औषध निर्माण कंपन्यामध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे विद्यार्थ्यांची सातत्याने निवड होत आली आहे. महाविद्यालय व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. महाविद्यालयात अत्याधुनिक प्रयोगशाळा, उच्च तंत्रज्ञानाने सुसज्ज अभ्यास केंद्र, कौशल्य विकास केंद्र, तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळत आहे. एम. फार्म या नवीन अभ्यासक्रमासाठी महाड पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना बाहेरगावी शिकायला जायची गरज पडणार नसल्यामुळे विद्यार्थ्यांना ही करियरसाठी सुवर्णसंधी ठरणार आहे.

# जेवण न बनविल्याने पतीकडून पतीची हत्या; पेणमधील घटना

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील शहापाडा धरणाचीवाडी परिसरात जेवण न बनविल्यावरून दाम्पत्यामध्ये कडाक्याचे भांडण होऊन रागाच्या भरात पतीने आपल्या पत्नीला जीवे मारल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

पेण तालुक्यातील रोडे येथील शहापाडा धरणाचीवाडी येथे गोपीनाथ विष्णू वाघमारे (वय ४०) आणि त्याची पत्नी भारती वाघमारे यांच्यात जेवण न बनविल्यावरून रात्री कडाक्याचे भांडण झाले. या वेळी रागाच्या भरात पती गोपीनाथने पत्नी भारतीला हाताक्क्याने व दगडाने बेदम मारहाण केली तसेच तिचे डोके भिंतीवर आपटून जीवे मारले.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी पती गोपीनाथ वाघमारेला पोलिसांनी अटक केली आहे. त्याला पेण न्यायालयात हजर केले असता ३० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास पोलिसांकडून सुरू आहे.



**माणगाव : राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आमदार भरत गोगावले यांचे शिवसेनेच्या महिला उपतालुकाप्रमुख सुवर्णा जाधव व सहकारी महिलांनी अभिनंदन केले.**













पनवेल, नवी मुंबई : बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या वतीने तळोजा येथे उभारण्यात येणाऱ्या ॲडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरचे भूमिपूजन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत झाले व पुढील समारंभ नेरूळमध्ये झाला. या वेळी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष खासदार मनन कुमार मिश्रा, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए.एस. गडकरी, नितीन सांबरे, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ आदी मान्यवर उपस्थित होते.















उलवे नोड : उद्योजक व व्यावसायिकांना महत्त्वाच्या निर्णयांची माहिती व्हावी, राज्याचे व्हिजन कळावे यासाठी स्व. दि.बा. पाटील भूमिपुत्र भवन येथे शनिवारी 'उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार सुनील तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी आदी उपस्थित होते.














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com